epaper.punebarbench.com

# पुणे BAR & BENCH

Journalism For Justice!

▪ PRGI No. : MHBIL/25/A1380

♦ वर्ष १ ♦ अंक : ५० ♦ साप्ताहिक ♦ पुणे, सोमवार, दिनांक १० ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२६ ♦ Email : punebarandbench@gmail.com ♦ पाने : १६ ♦ स्वागतमूल्य : १० रु. अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१



**डबल डिलाईट! एकाच दिवशी मिळाले दोन विजय!**

माझा पहिला खटला

"एक सीनियर वकिल ज्या प्रकरणात आधीच हरला होता, ते अपील माझ्यासारख्या नवशिक्या ज्युनिअरने लढवावे, असा विश्वास माझ्यावर दाखवला गेला. त्या एका विश्वासाने माझे संपूर्ण आयुष्य आणि दृष्टिकोन बदलून टाकले."

पान ७

SUPER OFFER

पुणे BAR & BENCH

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१, ऑफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०


epaper.punebarbench.com

**वर्गणीचे पर्याय |** स्वागत मूल्य : फक्त रु. १० एक वर्षासाठी रु. ५००

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट, आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

QR Code स्कॅन करा, पे करा.

# 'सिया' प्रकरणाचा धसका : उपवर मुला-मुलींच्या लग्नापूर्वीच्या आयुष्याची खातरजमा करण्यासाठी खासगी गुप्तहेरांची मदत घेण्याकडे चिंतीत कुटुंबियांचा वाढता कल







पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

लोहगड किल्ल्याच्या दरीत ढकलून सिया गोयलने आपल्या केतन अग्रवाल नावाच्या होणाऱ्या नवऱ्याची हत्या केल्याच्या कथित घटनेनंतर आणि देशभरात घडलेल्या इतर काही हाय-प्रोफाइल वैवाहिक गुन्हेगारी प्रकरणांमुळे पुण्यासह महाराष्ट्रभरात लग्नापूर्वी वधू किंवा वराची पार्श्वभूमी तपासण्यासाठी खाजगी गुप्तहेर संस्थांची (प्रायव्हेट डिटेक्टिव्ह) मदत घेण्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे. या थंड डोक्याने केलेल्या तथाकथित खुनामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे लग्नाआधीच संशय किंवा खबरदारी म्हणून गुप्तहेरांकडून माहिती काढण्याचे प्रमाण वाढले आहे.

पुणे , मुंबई आणि महाराष्ट्रातील विविध खाजगी गुप्तहेर संस्थांच्या मते, पूर्वी लोक फक्त एखाद्या विशिष्ट संशयापोटी किंवा समस्येसाठी संपर्क साधत असत.

पान ४ पहा ▸▸

YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कॉर्प' कडून पुणे BAR & BENCH वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!


# 'बार कौन्सिल'साठी हवी २० वर्षांच्या प्रॅक्टीसची अट

## महिलांना ३३ टक्के आरक्षण आणि ज्युनिअर वकिलांना स्टायपेंड देण्यासाठी 'जन अदालत'ची आक्रमक भूमिका

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

देशातील वकिलांच्या कल्याणासाठी आणि न्यायव्यवस्था अधिक पारदर्शक करण्यासाठी 'ॲडव्होकेट ॲक्ट १९६१' मध्ये तातडीने महत्त्वपूर्ण दुरुस्त्या कराव्यात, अशी आक्रमक आणि सर्वसमावेशक मागणी 'जन अदालत' या अग्रेसर संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने (BCI) सर्व राज्यांकडून ॲडव्होकेट ॲक्टमधील दुरुस्त्या व सूचनांसाठी १८ जुलै २०२६ रोजी एक परिपत्रक जारी केले होते. येत्या हिवाळी अधिवेशनात यावर चर्चा होऊन दुरुस्ती विधेयक पारित होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, 'जन अदालत'च्या रिसर्च टीमने आणि तज्ज्ञ पदाधिकाऱ्यांनी सखोल अभ्यास करून या कायद्यात कराव्याच्या ११ अत्यंत महत्त्वाच्या शिफारसी बीसीआयकडे पाठवल्या आहेत.

'जन अदालत' संस्था नेहमीच विविध कायद्यांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी अग्रेसर राहिली आहे. संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या विशेष बैठकीत वकिलांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




**कायद्यातील प्रमुख मागण्या आणि सूचना:**

- **जिल्हानिहाय प्रतिनिधित्व:** बार कौन्सिल सदस्यांची संख्या जिल्हानिहाय असावी आणि प्रत्येक जिल्ह्यातून एक प्रतिनिधी निवडला जावा.
- **पात्रता निकष:** बार कौन्सिलच्या निवडणुकीसाठी उमेदवारास किमान २० वर्षांची प्रॅक्टीस असण्याची सक्तीची मर्यादा असावी.
- **महिला आरक्षण:** महिला वकिलांना सर्व स्तरांवर ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद करावी.
- **पारदर्शक निवडणूक:** निवडणूक प्रक्रिया अत्यंत पारदर्शक राहावी यासाठी स्वतंत्र नियमावली असावी. बोगस मतदान रोखण्यासाठी आणि मतमोजणीतील फेरफार टाळण्यासाठी कठोर नियम करून दोषींना शिक्षेची तरतूद करावी.
- **वकिलांवरील तक्रारींची छाननी:** वकिलांवर किंवा पक्षकारांकडून होणाऱ्या तक्रारींची सत्यता तपासण्यासाठी एक स्वतंत्र 'स्क्रिनिंग यंत्रणा' असावी, जेणेकरून खात्री पटल्यानंतरच तक्रार दाखल करून घेतली जाईल.
- **पोलिस कारवाईपूर्वी पडताळणी:** पोलिसांकडे येणाऱ्या वकिलांच्या तक्रारींची शहानिशा झाल्याशिवाय आणि बार कौन्सिल सदस्य किंवा स्क्रिनिंग कमिटीकडून पडताळणी झाल्याशिवाय वकिलावर गुन्हा दाखल करू नये.
- **ज्युनिअर वकिलांना स्टायपेंड:** नवोदित ज्युनिअर वकिलांना सुरुवातीची ५ वर्षे बार कौन्सिल आणि स्थानिक राज्य सरकारने एकत्रितपणे दरमहा स्टायपेंड द्यावा.
- **सन्मान निधी:** वयाच्या ६० वर्षानंतरच्या ज्येष्ठ वकिलांना राज्यस्तरीय बार कौन्सिलमार्फत 'सन्मान निधी' सुरू करावा.
- **पायाभूत सुविधा:** सर्व न्यायालयांमध्ये वकिलांसाठी व पक्षकारांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बार कौन्सिलने शासनाकडे पाठपुरावा करणे बंधनकारक करावे.
- **विमा योजना:** वकिलांसाठी सर्वसमावेशक आणि पारदर्शक विमा पॉलिसी योजना लागू करावी.
- **नोंदणी शुल्क कपात:** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे नवोदित वकिलांना भरावे लागणारे प्रस्तावित नोंदणी शुल्क तातडीने कमी करावे.

या महत्त्वपूर्ण सूचनांच्या मसुद्यावर ॲड. सागर नेवसे, ॲड. अविनाश पाठक, ॲड. प्रवीण तांबवेकर, ॲड. देवेंद्र पाटील आणि ॲड. स्वाती चौधरी यांनी बैठकीत सविस्तर चर्चा करून अंतिम रूप दिले. त्यानंतर या सर्व मागण्यांचा प्रस्ताव २ ऑगस्ट २०२६ रोजी अधिकृतपणे बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे पाठवण्यात आला आहे. वकिलांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी शासनाने या दुरुस्त्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी अपेक्षा 'जन अदालत'चे अध्यक्ष ॲड. सागर नेवसे यांनी व्यक्त केली आहे.

# वकिलांना मारहाण प्रकरणी पोलीस कर्मचारी अखेर निलंबित

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

ॲड. साहिल दिलावर शेख यांना केलेल्या अमानुष मारहाण संदर्भात पुणे बार असोसिएशनने जाहीर निषेध करून संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी पुणे बार असोसिएशनच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. पोलीस उपायुक्त क्रमांक सात अबिनाश कुमार यांची पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.राम भुजबळ, उपाध्यक्ष ॲड.कांताराम नप्ते पाटील, ॲड.प्रतापराव मोरे, सचिव ॲड.सम्राट जांभुळकर, ॲड.अभिजीत पोळ, ॲड.नेहा जांभळे , खजिनदार ॲड.अंजली बांदल, ऑडिटर ॲड.पूजा पवार ऑडिटर ॲड.शिवराज निंबाळकर सदस्य ॲड.उमेश मांजरे ॲड.योगेश जैन ॲड.स्मिता वाघमारे ॲड.गुंजन भोसले त्याचप्रमाणे अध्यक्ष शिरूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.विकास फडतरे तसेच मा. सचिव ॲड.राहुल कदम समवेत पुणे जिल्ह्यातील तमाम वकील बंधू भगिनी यांनी उपस्थिती दाखवली या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित कर्मचाऱ्यावरती निलंबनाची कारवाई करण्यात आली. तसेच नितीन पोंधे यांच्यावरती गुन्हाही दाखल करण्यात आलेला आहे. आणि त्यामुळे वकिलांच्या मध्ये समाधानाची बाब व्यक्त करण्यात आली. भविष्यकाळामध्ये वकील बांधवांच्या वरती कोणत्याही माध्यमातून अशा प्रकारचा हल्ले झाल्यास खपवून घेतले जाणार नाही असा इशारा पुणे बार असोसिएशनच्या वतीने देण्यात आला.

# पुण्यात पॅनेलवरील मध्यस्थांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण झाले संपन्न

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई तसेच मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या समन्वयाने पॅनेलवरील मध्यस्थांसाठी दोन दिवसीय अभिमुखता व प्रशिक्षण कार्यक्रमाचे २४ व २५ जुलै रोजी हॉटेल अरोरा टॉवर्स, पुणे येथे करण्यात आले. यावेळी पुणे जिल्ह्यातील २७५ पॅनेलवरील मध्यस्थ सहभागी झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. ए. टी. वानखेडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा मुख्य मध्यस्थी केंद्राचे संचालक/समन्वयक मा. एस. सलमान आझमी उपस्थित होते. यावेळी मुख्य मध्यस्थी केंद्राचे उपसंचालक प्रवीण ए. कुंभोजकर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती आर. देशपांडे उपस्थित होत्या.



प्रशिक्षणादरम्यान मध्यस्थी अधिनियम, २०२३, प्रभावी संवाद, ऑनलाइन वाद निवारण (ODR), मानसिक आरोग्य आणि मध्यस्थी, समुपदेशन, मध्यस्थांची भूमिका, संघर्ष समजून घेणे आणि मध्यस्थीची संकल्पना आदी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी आणि पर्यायी वाद निवारण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षित मध्यस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे वयांनी अधोरेखित केले.

दुसऱ्या दिवशी सहभागी मध्यस्थांसाठी प्रश्नोत्तर व शंका-समाधान सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मध्यस्थांनी प्रत्यक्ष कामकाजातील अनुभव, अडचणी आणि प्रक्रियेसंदर्भातील प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यावर सविस्तर मार्गदर्शन करून प्रभावी मध्यस्थीसाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला.

दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साही, सकारात्मक आणि सहभागात्मक वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे मध्यस्थांचे व्यावसायिक कौशल्य, संवाद क्षमता आणि मध्यस्थी प्रक्रियेतील गुणवत्ता अधिक बळकट होण्यास मदत होणार असून न्यायव्यवस्थेतील पर्यायी वाद निवारण प्रणाली अधिक प्रभावी होण्यास हातभार लागणार आहे.

# घोडनदी बार असोसिएशन (शिरूर तालुका) अध्यक्षपदी ॲड. विकासबापू फडतरे यांची निवड

शिरूर तालुक्यातील घोडनदी बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. विकासबापू फडतरे यांची प्रचंड बहुमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शिरूर आणि घोडनदी परिसरातील वकील वर्गात व कायदेशीर वर्तुळात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



या निवडणुकीमध्ये बार असोसिएशनच्या विविध पदांवर इतर विधीज्ज्ञांचीही बिनविरोध व बहुमताने निवड झाली आहे. यामध्ये उपाध्यक्षपदी ॲड. गणेश कळसकर, महिला उपाध्यक्षपदी ॲड. कीर्ती श्रीकांत, सचिवपदी ॲड. अक्षय पाचर्णे आणि खजिनदारपदी ॲड. धनंजय गायकवाड यांनी सूत्रे स्वीकारली आहेत. तसेच, कार्यकारिणी सदस्य म्हणून ॲड. गणेश सटाले, ॲड. गणेश चौगुले, ॲड. भरत खाडे, ॲड. तेजल गायकवाड आणि ॲड. शुभांगी गवळी यांची निवड करण्यात आली आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या व वकीलांच्या हिताच्या रक्षणासाठी आणि त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याची भूमिका व्यक्त केली आहे.

या संपूर्ण नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभाप्रसंगी अनेक नामवंत वकील, ज्युनिअर-सिनीयर कायदेतज्ज्ञ तसेच स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

# जाणून घ्या कायद्याची भाषा




- **आच्छादनाचा सिद्धांत** (Doctrine of Eclipse) : जेव्हा एखादा जुना कायदा मूलभूत हक्कांच्या आड येतो, तेव्हा तो पूर्णपणे नष्ट होत नाही, तर मूलभूत हक्कांमुळे फक्त झाकला (सुप्त) जातो.
- **संवादात्मक मांडणीचा सिद्धांत** (Doctrine of Harmonious Construction) : संविधानातील दोन कलमांमध्ये विरोध निर्माण झाल्यास, कोणताही भाग निरर्थक न ठरवता दोन्हीमध्ये सुवर्णमध्य साधून अर्थ लावणे.
- **रंगीत अधिकाराचा सिद्धांत** (Doctrine of Colorable Legislation): जे काम संसद थेट करू शकत नाही, ते ती अप्रत्यक्षपणे किंवा फिरवूनही करू शकत नाही (अधिकार क्षेत्राचे उल्लंघन रोखणे).
- **प्रादेशिक संबंधाचा सिद्धांत** (Doctrine of Territorial Nexus): राज्याने केलेला कायदा राज्याबाहेरील वस्तू किंवा व्यक्तीला तेव्हाच लागू होऊ शकतो, जेव्हा त्या वस्तूचा राज्याशी थेट आणि मजबूत संबंध असतो.
- **ताबा सोडण्याचा हक्क** (Right of Eminent Domain) : सार्वजनिक हितासाठी नागरिकांची खाजगी मालमत्ता योग्य ती भरपाई देऊन ताब्यात घेण्याचा सरकारचा सर्वोच्च सार्वभौम अधिकार.
- **अधिकार संपादन सिद्धांत** (Doctrine of Occupied Field) : जर एखाद्या विषयावर केंद्र सरकारने आधीच कायदा केला असेल, तर त्याच विषयावर राज्य सरकारला कायदा करण्याचा अधिकार उरत नाही.
- **न्यायिक पुनर्विलोकन** ( Judicial Review) : संसदेने केलेले कायदे किंवा सरकारने घेतलेले निर्णय संविधानानुसार वैध आहेत की नाही, हे तपासण्याचा न्यायालयाचा सर्वोच्च अधिकार.
- **यथास्थिती आदेश** (Status Quo) : खटल्यातील वादाचा मुद्दा किंवा परिस्थिती जशी आहे तशीच (बदल न करता) ठेवण्याचा न्यायालयाचा तात्पुरता आदेश.
- **जनहित याचिका** (Public Interest Litigation (PIL): पीडित व्यक्ती स्वतः न्यायालयात जाऊ शकत नसेल, तर समाजातील इतर कोणत्याही व्यक्तीने सार्वजनिक हितासाठी दाखल केलेली याचिका.
- **स्वत:हून दखल घेणे** (Suo Motu) : कोणत्याही पक्षाने तक्रार दाखल न करता, वृत्तपत्रांतील किंवा इतर माहितीच्या आधारे न्यायालयाने स्वत:हून एखाद्या गंभीर घटनेची दखल घेणे.
- **न्यायिक सक्रियता** (Judicial Activism) : जेव्हा सरकार किंवा प्रशासन नागरिकांचे हक्क जपण्यात अपयशी ठरते, तेव्हा न्यायालयाने स्वत:हून पुढे होऊन धोरणात्मक आदेश देणे.
- **अधिकार संकोच**(Doctrine of Laches) : जर एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या हक्कासाठी न्यायालयात येण्यास विनाकारण खूप उशीर केला, तर न्यायालय तिचा खटला फेटाळू शकते.
- **केवळ निवाड्यापुरते** (Ad Hoc) : एखाद्या विशिष्ट आणि तात्पुरत्या कामासाठी किंवा खटल्यासाठी तात्पुरती केलेली नियुक्ती (उदा. Ad-hoc न्यायाधीश).
- **कायदेशीर दायित्व** (Strict Liability): एखादी कृती करताना तुमचा कोणताही चुकीचा हेतू नसला किंवा निष्काळजीपणा नसला, तरी झालेल्या नुकसानीची सर्व जबाबदारी तुमचीच असणे.
- **संपूर्ण उत्तरदायित्व** (Absolute Liability) : घातक किंवा विषारी उद्योग करणाऱ्या कंपन्यांच्या बाबतीत लागू होणारा नियम; अपघात झाल्यास कोणत्याही सबबीशिवाय १००% भरपाई द्यावीच लागते.

## शांतता...हे कोर्ट आहे! पुणे BAR & BENCH



संकल्पना : विजय चव्हाण

# आर्थिक विवंचनेमुळे तरुण वकिलांना पेशा सोडावा लागणे हे 'ब्रेन ड्रेन'च!

## ज्येष्ठ वकिलांच्या हाताखाली काम करणाऱ्या ज्युनियर वकिलांना आर्थिक स्थैर्य मिळावे; महाराष्ट्र शासनासह संबंधितांना मुंबई उच्च न्यायालयाची नोटीस


पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

वकिली व्यवसायात पाय रोवू पाहणाऱ्या तरुण आणि विशेषतः पहिल्या पिढीतील ज्युनियर वकिलांच्या आर्थिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाची जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. वकिलांच्या कल्याणाचा हा प्रश्न संपूर्ण कायदेशीर क्षेत्राशी जोडलेला आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने महाराष्ट्र शासनासह सर्व संबंधित प्रतिवाद्यांना नोटीस बजावली आहे.

या प्रकरणी सकलेन मन्सूर मुजावर आणि इतर २१ तरुण वकिलांनी (मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका (डब्लू.पी. स्ट. क्र. ६५९२/२०२६) दाखल केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने अ‍ॅड. असीम सरोदे यांनी बाजू मांडली, तर प्रतिवादी पक्षातर्फे महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी विश्वस्त समितीचे अध्यक्ष व इतर तसेच राज्य शासनातर्फे अतिरिक्त सरकारी वकील (AGP) अ‍ॅड. तेजस जे. कापरे यांनी सहभाग घेतला.

याचिकेत नमूद करण्यात आले आहे की, 'महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी कायदा, १९८१' अंतर्गत वैधानिक चौकट उपलब्ध असूनही, सध्याची यंत्रणा ज्युनियर वकिलांना पुरेशा प्रमाणात आर्थिक आधार देण्यात अपयशी ठरली आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या १५ ऑक्टोबर २०२४ च्या परिपत्रकानुसार, शहरांमध्ये किमान २०,००० रुपये आणि ग्रामीण भागात १५,००० रुपये मासिक स्टायपेंड ज्युनियर वकिलांना देण्याची शिफारस करण्यात आली आहे; परंतु या शिफारशीची अंमलबजावणी अजूनही झालेली नाही. आर्थिक विवंचनेमुळे अनेक प्रतिभावान तरुण वकील वकिली सोडून इतर क्षेत्रांकडे वळत आहेत. झारखंड, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक आणि पुद्दुचेरी यांसारख्या राज्यांनी ज्युनियर वकिलांसाठी आधीच विविध कल्याणकारी उपाययोजना केल्या आहेत. तसेच, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाकडे मोठा निधी उपलब्ध असल्याचा दावाही याचिकेत करण्यात आला आहे.



सुनावणीदरम्यान खंडपीठाने 'सारिका त्यागी विरुद्ध भारत सरकार' या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा विशेष उल्लेख केला. सुरुवातीच्या काळात येणाऱ्या आर्थिक अस्थिरतेमुळे अनेक हुशार तरुण वकील वकिली सोडतात, ज्यामुळे कायदेशीर क्षेत्राची गुणवत्ता खालावत चालली असून याला व्यावसायिक 'ब्रेन ड्रेन' म्हणावे लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. पहिल्या पिढीतील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल तरुण वकिलांना त्यांच्या सुरुवातीच्या काळात योग्य तो स्टायपेंड किंवा मानधन मिळण्यासाठी विशेष निधी तयार करण्याची गरज न्यायालयाने अधोरेखित केली होती.

**उच्च न्यायालयाचे निर्देश:** न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, तरुण वकील एका उच्च व नोबल व्यवसायाशी जोडलेले आहेत आणि त्यांच्या या धडपडीला संस्थात्मक पाठबळ मिळायला हवे. जरी हा प्रश्न राज्य सरकार आणि बार कौन्सिलच्या अखत्यारीत येत असला, तरी सर्व भागधारकांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी तरुण वकिलांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी साहाय्य करावे. न्यायप्रविष्ट मुद्द्यांमध्ये तथ्य असल्याचे सांगत न्यायालयाने प्रतिवाद्यांना नोटीस जारी केली आहे. तसेच महाराष्ट्रातील तरुण वकिलांना आर्थिक मदत, स्टायपेंड किंवा कल्याणकारी योजना सुरू करण्यासाठी आतापर्यंत काय पावले उचलली आहेत किंवा भविष्यात काय तयारी आहे, याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ ऑगस्ट २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **प्रकरणाचे नाव:** सकलेन मन्सूर मुजावर आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी विश्वस्त समितीचे अध्यक्ष व इतर
- **खटला क्रमांक:** रिट याचिका (स्ट.) क्रमांक ६५९२ / २०२६
- **खंडपीठ:** न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे

# महाराष्ट्रात पेपर लीक प्रकरणांसाठी २३ विशेष जलदगती न्यायालये स्थापन!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबई उच्च न्यायालयाने शनिवारी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ही विशेष न्यायालये 'सार्वजनिक परीक्षा प्रतिबंधक कायदा, २०२४', 'भारतीय न्याय संहिता' (BNS) आणि 'महाराष्ट्र परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा, १९८२' या अंतर्गत दाखल होणाऱ्या खटल्यांची सुनावणी घेणार आहेत.

ही नवीन न्यायालये पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नागपूर, बीड, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, जालना, धाराशिव, परभणी, वर्धा, यवतमाळ, नंदुरबार आणि इतर महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात आली आहेत. याआधी २४ जुलै रोजी नागपूर व औरंगाबाद येथे दोन न्यायालये स्थापन करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षा गैरव्यवहारातील दोषींवर कठोर शिक्षेची घोषणा केल्यानंतर, केंद्र सरकारच्या विनंतीवरून हे पाऊल उचलण्यात आले आहे. २०२४ च्या नवीन कायद्यानुसार अशा प्रकरणांमधील खटल्यांची सुनावणी अवघ्या तीन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. 'कॉकरोच जनता पक्षाच्या' निदर्शनानंतर आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घडामोडींमुळे परीक्षा गैरव्यवहार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या जलदगती न्यायालयांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना कठोर शिक्षा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पान १ वरून

# प्री-मॅरेज इन्व्हेस्टिगेशन ऑन बूम...



परंतु आता सर्व काही सुरळीत आणि ठीक दिसत असतानाही, भविष्यात कोणतीही अप्रीतिकर घटना किंवा फसवणूक टाळण्यासाठी कुटुंबे स्वतःहून पडताळणी करण्यासाठी पुढे येत आहेत.

मॅट्रिमोनिअल बॅकग्राऊंड चेक हा सध्या या खाजगी गुप्तहेर एजन्सींसाठी उत्पन्नाचा एक मोठा स्त्रोत बनला आहे. मुंबईतील एका गुप्तहेर एजन्सीच्या कर्मचाऱ्याने सांगितले की, लोहगड घटनेनंतर त्यांना लग्नापूर्वी वधू किंवा वराची पार्श्वभूमी तपासण्यासाठी सतत नवीन विनंत्या येत आहेत, जेणेकरून भावी वधू किंवा वराचे कोणतेही गुप्त संबंध किंवा लपवलेली माहिती समोर येऊ शकेल.

**धक्कादायक उदाहरणे आणि गुप्त संभाषणांची मागणी**

काही प्रकरणांमध्ये पालकांचे वर्तन टोकाला पोहोचल्याचे दिसून येते. खाजगी गुप्तहेरांच्या म्हणण्यानुसार, अनेक कुटुंबे कॉल डिटेल रेकॉर्ड्स (सीडीआर), खाजगी मेसेज किंवा ई-मेल मिळवण्याची मागणी करतात, जे मिळवणे बेकायदेशीर ठरू शकते.

एका घटनेत, एका कुटुंबाला वराने लैंगिक बदलाबद्दलची शस्त्रक्रिया (जेंडर रीअसायन्मेंट सर्जरी / केली होती का, तो समलैंगिक (गे) होता का, किंवा तो आधीच विवाहित किंवा घटस्फोषित होता का, हे जाणून घ्यायचे होते. इतर काही प्रकरणांमध्ये खालील घटना समोर आल्या आहेतः एका मुंबईतील कुटुंबाने गुप्तहेरांच्या तपासात भावी वराने मोठे कर्ज आणि चालू असलेले कायदेशीर वाद लपवल्याचे समोर आल्यानंतर आपल्या मुलीचे लग्न मोडले.

एका कुटुंबाने वराच्या शैक्षणिक पात्रता आणि रोजगाराच्या माहितीत तफावत आढळल्यानंतर लग्नाचा निर्णय रद्द केला.

एका गुजराती कुटुंबाने जून महिन्यात भावी वराची नियमितपणे एका महिला सहकाऱ्यासोबत पूल कॅबने जाण्यायेण्याची माहिती मिळाल्यानंतर लग्न मोडून टाकले. अन्य एका प्रकरणात, भावी वधू तिचे कॉलेजच्या काळातील क्रशसोबत अजूनही मित्र म्हणून राहत असल्याचे समोर आल्यावर कुटुंबाने संबंध तोडले.

**देशभरातील हाय-प्रोफाइल गुन्हे आणि भीतीचे वातावरण**

देशभरात घडलेल्या काही भयानक हत्या प्रकरणांमुळे पालकांमध्ये सुरक्षेची भीती निर्माण झाली आहे. यामध्ये इंदूरचा व्यावसायिक राजा रघुवंशी याची मेघालयमध्ये हनिमून दरम्यान झालेली हत्या आणि या प्रकरणात त्याच्या पत्नीला आणि तिच्या कथित प्रियकराला झालेली अटक हे प्रकरण गाजले. तसेच बिहारमधील एका नवविवाहितेने लग्नाच्या अवघ्या ४५ दिवसांनी पतीच्या खूनाचा कट रचल्याची घटना समोर आली होती. या सर्व घटनांमुळे पालकांमध्ये घबराट पसरली आहे.

स्ट्रॅटेजिक असाइनमेंट अँड इंटेलिजन्स ब्युरोच्या दर्शन शाह यांनी सांगितले की, प्री-मॅरेज बॅकग्राऊंड चेक नवीन नसले तरी गेल्या काही महिन्यांत यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. पारंपारिक कुटुंबे सहसा रोजगार, वेतन, गुन्हेगारी पार्श्वभूमी, आर्थिक स्थिती आणि मित्रांचे वर्तुळ तपासण्यावर भर देत असत, परंतु आता या मागण्या अधिक खाजगी आणि विशिष्ट गोष्टींकडे झुकल्या आहेत.

**कायदेशीर मर्यादा आणि तज्ज्ञांचा इशारा**

तज्ज्ञांच्या मते, योग्य ती काळजी घेणे आणि कायद्याचे उल्लंघन करून अतिक्रमण करणे यामध्ये एक अतिशय बारीक रेषा असते. सार्वजनिक रेकॉर्ड, कायदेशीर चौकशी आणि संमतीवर आधारित पडताळणी करणे कायदेशीर ठरू शकते, परंतु खाजगी संदेश हॅक करणे किंवा सोशल मीडिया अकाउंट्स बळकावणे बेकायदेशीर आहे.

निवृत्त पोलीस अधिकारी आणि वकील वाय. पी. सिंग यांच्या मते, पार्श्वभूमी तपासण्यासाठी सामान्य पडताळणी करणे हा गुन्हा ठरत नाही, जर ती योग्य विवेकबुद्धीने आणि मर्यादेत केली गेली. परंतु, जर एखाद्या व्यक्तीचा एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी किंवा अनपेक्षितपणे पाठलाग केला गेला (स्टॉकिंग ), तर तो क्रिमिनल लॉ अमेंडेड १९३२ च्या कलम ७ नुसार एक दखलपात्र गुन्हा ठरू शकतो. त्यामुळे पालकांनी आणि तपास यंत्रणांनी कायदेशीर मर्यादांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

# जळालेल्या बसचा विमा नाकारला

## भरपाई देण्याचा ग्राहक आयोगाचा आदेश

बसला आग लागण्याचे कारण तांत्रिक (शॉर्ट सर्किट) असताना, परवान्याचे कारण देत विमा नाकारणाऱ्या कंपनीला अतिरिक्त जिल्हा ग्राहक आयोगाने दणका दिला आहे. तक्रारदाराला १४ लाख २९ हजार ५२८ रुपये ९ टक्के व्याजाने आणि मानसिक त्रासापोटी ४० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

संदेश सुभाश पंडे यांनी एड. विजय अग्रवाल यांच्यामार्फत बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. पंडे यांची बस जळून खाक झाल्यानंतर, वाहनाचा वापर आणि परवान्याबाबत चुकीची माहिती दिल्याचे कारण सांगत कंपनीने विमा क्लेम नाकारला होता.

यावर सुनावणी करताना अध्यक्ष डॉ. अरुण गायकवाड आणि सदस्या कांचन गंगोदे यांनी स्पष्ट केले की, बसला लागलेली आग ही तांत्रिक विद्युत बिघाडामुळे होती. बसमध्ये प्रवासी होते की नाही किंवा ती कोणत्या मार्गावर होती, याचा आगीशी संबंध नाही. अटींचे उल्लंघन झाल्याचे सांगून दावा फेटाळणे अयोग्य आहे. मात्र, वाहनाचा वापर तांत्रिकदृष्ट्या वेगळ्या कारणासाठी केल्याचे निरीक्षण नोंदवत, आयोगाने स्वतःहून निश्चित केलेल्या रकमेच्या ७५ टक्के रक्कम (१४ लाख २९ हजार ५२८ रुपये) २१ डिसेंबर २०२२ पासून ९ टक्के व्याजाने देण्याचे आदेश दिले. तसेच तक्रारदारास झालेल्या त्रासापोटी २५ हजार व अर्जाच्या खर्चासाठी १५ हजार रुपये देण्याचेही नमूद केले आहे.

# स्मॉल कॉज कोर्ट व न्यू बिल्डिंगमध्ये मोफत वाय-फाय

## जिल्हा न्यायालयातील वकिलांची इंटरनेट समस्येतून सुटका; पुणे बार असोसिएशनचा दिलासादायक निर्णय

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुणे जिल्हा न्यायालय परिसरातील वकिलांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. वकिलांच्या दीर्घकाळच्या मागणीला अखेर मोठे यश मिळाले असून, पुणे बार असोसिएशनतर्फे स्मॉल कॉज कोर्ट आणि न्यू बिल्डिंग परिसरात मोफत वाय-फाय (Free Wi-Fi) सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे न्यायालयीन कामकाजादरम्यान इंटरनेट कनेक्टिव्हिटीमुळे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांवर मात करणे शक्य होणार आहे.

**इंटरनेट समस्येमुळे वकिलांना होत होती कसरत**

पुणे जिल्हा न्यायालय परिसरात मोठ्या संख्येने वकील प्रॅक्टिस करतात. मात्र, या परिसरात मोबाईल नेटवर्कची कमतरता आणि पुऱ्या कनेक्टिव्हिटीअभावी इंटरनेटच्या तीव्र समस्येला वकिलांना गेल्या अनेक दिवसांपासून सामोरे जावे लागत होते. आजच्या डिजिटल युगात ई-फायलिंग करणे, ऑनलाइन सुनावणीत सहभागी होणे, न्यायनिर्णयांचा सखोल अभ्यास करणे, कायदेशीर संशोधन (Legal Research) करणे तसेच केस पेपर तयार करणे यासाठी हाय-स्पीड इंटरनेटची नितांत गरज असते. नेटवर्कच्या समस्येमुळे वकिलांचे अनेक महत्त्वाचे डिजिटल कामकाज रखडत होते आणि कामात अनावश्यक अडथळे निर्माण होत होते.

**पाठपुराव्याला यश; उत्स्फूर्त प्रतिसाद**

वकिलांच्या या गंभीर समस्येची दखल घेत पुणे बार असोसिएशनच्या विद्यमान कार्यकारिणीने या प्रश्नावर सातत्याने आणि गांभीर्याने पाठपुरावा केला. काही दिवसांपूर्वीच सिव्हिल कोर्ट इमारतीमध्ये मोफत वाय-फाय सुविधा सुरू करण्यात आली होती. वकिलांकडून या उपक्रमाला अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याच पार्श्वभूमीवर आता स्मॉल कॉज कोर्ट बिल्डिंग आणि न्यू बिल्डिंग परिसरातही मोफत वाय-फाय झोन अधिकृतपणे सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचे औपचारिक उद्घाटन नुकतेच न्यायालयीन क्षेत्रातील मान्यवरांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटात संपन्न झाले.



**कामकाज होणार अधिक जलद व कार्यक्षम**

या नव्या वाय-फाय सुविधेमुळे न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या सर्व डिजिटल आणि ऑनलाइन सेवा आता अत्यंत वेगाने आणि सुलभपणे उपलब्ध होणार आहेत. वकिलांचा बहुमूल्य वेळ वाचण्यास यामुळे मोठी मदत होणार असून, त्यांची दैनंदिन कार्यक्षमता अधिक वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे वकिलांना खटल्यांच्या तयारीसाठी आणि कायदेशीर संशोधनासाठी कोर्ट परिसरातच हवी ती माहिती एका क्लिकवर मिळवणे शक्य होणार आहे.

**पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती व आवाहन**

या उद्घाटन प्रसंगी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम भुजबळ, उपाध्यक्ष ॲड. कांताराम नप्ते पाटील, ॲड. प्रतापराव मोरे, सचिव ॲड. सम्राट जांभुळकर, ॲड. अभिजित पोळ, ॲड. नेहा जांभळे, खजिनदार ॲड. अंजली बांदल, ऑडिटर ॲड. शिवराज निंबाळकर, ॲड. पूजा पवार, तसेच कार्यकारिणी सदस्य ॲड. अनिल हुडे व ॲड. उमेश मांजरे यांच्यासह इतर अनेक मान्यवर व सदस्य विशेष उपस्थित होते.

*"पुणे जिल्हा न्यायालयातील वकिलांना इंटरनेट व मोबाईल नेटवर्कच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. वकिलांच्या या अडचणीची गंभीर दखल घेऊन पुणे बार असोसिएशनने सातत्याने पाठपुरावा केला आणि त्यातून आज ही मोफत वाय-फाय सुविधा उपलब्ध झाली आहे. भविष्यातही वकिलांच्या हितासाठी आधुनिक व उपयुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यास आमची कार्यकारिणी कटिबद्ध राहील."*

**ॲड. सम्राट जांभुळकर,**
सचिव, पुणे बार असोसिएशन

# मुस्लिम बहुपत्नीत्व विरोधात पुणेकरांची सर्वोच्च याचिका

मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातील बहुपत्नीत्वाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून घेण्यात आली असून, न्यायालयाने केंद्र सरकार आणि संबंधित विविध विभागांना नोटीस पाठवून या प्रकरणी सविस्तर स्पष्टीकरण मागितले आहे. पहिल्या पत्नीच्या हयातीत दुसरे लग्न करणे अवैध ठरवून त्यास शिक्षेस पात्र गुन्हा घोषित करण्याची प्रमुख मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. तसेच, मुस्लिम समाजातील विवाह आणि वारसाहक्क यांसारख्या महत्त्वाच्या बाबींसाठी लिंग-निरपेक्ष कायदे करण्याची आग्रही मागणीही या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

सध्या या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची व व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुरू असून, त्यांनी यासंदर्भात नोटीस बजावली आहे. ही महत्त्वपूर्ण याचिका महिलाधिकार कार्यकर्त्या व भारतीय मुस्लिम महिला आंदोलनाच्या सहसंस्थापक डॉ. झकिया सोमन, डॉ. नूरजहाँ साफिया नियाज़, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे डॉ. शमसुद्दीन तांबोळी, इंडियन मुस्लिम फॉर सेक्युलर डेमॉक्रसीचे जावेद आनंद आणि बद्र सईद यांनी संयुक्तपणे दाखल केली होती. 'याचिकाकर्त्यांनी 'मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) एप्लिकेशन ॲक्ट, १९३७' अंतर्गत अस्तित्वात असलेल्या बहुपत्नीत्वाच्या प्रथेच्या घटनात्मक वैधतेला गंभीर आव्हान दिले आहे, अशी माहिती मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी दिली आहे.

या कायदेशीर लढाईमुळे मुस्लिम पर्सनल लॉ मधील तरतुदींवर पुन्हा एकदा मोठी राष्ट्रीय चर्चा सुरू झाली असून, यावर केंद्र सरकार काय भूमिका घेणार आणि न्यायालय आगामी काळात कायदेशीर निर्णय देणार, याकडे संपूर्ण देशाचे व कायदेशीर वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे

# पिंपरी-चिंचवडसाठी विशेष मोटार वाहन न्यायालय मंत्रिमंडळाची मंजुरी

## शहराच्या न्यायिक पायाभूत सुविधांमध्ये वाढ

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळ बैठकीत पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. शहराचा झपाट्याने होणारा नागरी विस्तार आणि दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या लक्षात घेता, हा निर्णय अत्यंत दूरगामी आणि महत्त्वाचा मानला जात आहे. या महत्त्वपूर्ण मागणीसाठी 'पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन'कडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता.

यापूर्वी जानेवारी २०२६ मध्ये पिंपरी-चिंचवड शहराला स्वतःचे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर मिळाले होते. त्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच विशेष मोटार वाहन न्यायालयाला शासनाची मान्यता मिळाल्याने शहराच्या न्यायिक पायाभूत सुविधांमध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शहरात स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन झाल्यानंतर वाहन अपघात, वाहतूक नियमभंग आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या खटल्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ही प्रकरणे पुण्याच्या न्यायालयांमध्ये चालवली जात असल्यामुळे तेथील यंत्रणेवर प्रचंड ताण येत होता. या नव्या न्यायालयाच्या स्थापनेमुळे नागरिक, पोलीस यंत्रणा, विमा कंपन्या तसेच वकील वर्गाला




आता स्थानिक पातळीवरच जलद, सुलभ व प्रभावी न्यायप्रक्रिया उपलब्ध होणार आहे.

या न्यायालयाच्या स्थापनेचा सविस्तर प्रस्ताव पुणे जिल्हा न्यायालयामार्फत उच्च न्यायालयाकडे पाठवण्यात आला होता. उच्च न्यायालयाच्या 'इस्टॅब्लिशमेंट ऑफ न्यू कोर्ट कमिटी'ने या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखविल्यानंतर तो विधी व न्याय विभागामार्फत राज्य शासनाकडे सादर करण्यात आला. विविध पातळ्यांवर झालेल्या या कायदेशीर पाठपुराव्याला अखेर यश आले असून मंत्रिमंडळाने यावर अंतिम शिक्कामोर्तब केले आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि प्रलंबित खटल्यांचे प्रमाण पाहता भविष्यात आणखी नवी न्यायालये व न्यायाधीशांची पदे वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मत बार असोसिएशनने व्यक्त केले आहे.

"पिंपरी-चिंचवडसाठी विशेष मोटार वाहन न्यायालयास मिळालेली मंजुरी ही शहराच्या न्यायिक विकासातील एक ऐतिहासिक पायरी आहे. या न्यायालयाच्या स्थापनेसाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना यश मिळाल्याचा मनस्वी आनंद असून माननीय उच्च न्यायालय, राज्य शासन, जिल्हा न्यायालय प्रशासन व सर्व संबंधितांचे आभार. या निर्णयामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाचून स्थानिक पातळीवर जलद न्याय मिळेल." ॲड. उमेश राम खंदारे, सचिव, पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन

# मोठ्या मूर्तींच्या 'सांकेतिक विसर्जन' करावे?

## प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींचे विसर्जन केल्याने पर्यावरणाचे रक्षण कसे होणार: मुंबई उच्च न्यायालय

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मोठ्या गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करण्याऐवजी त्यांचे 'सांकेतिक विसर्जन' करून पुढे विरघळवणे किंवा पुनर्वापर करणे योग्य ठरेल, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. यामुळे कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, उलट येत्या पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण होण्यास मदत होईल, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले आहे.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर नैसर्गिक जलस्रोतांमध्ये पीओपी च्या गणेश आणि दुर्गा मूर्तींच्या विसर्जनावर पूर्ण बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी सुरू आहे.

**युक्तिवाद आणि न्यायालयाचे निरीक्षण:**

सुनावणीदरम्यान 'अखिल गणपती उत्सव समिती'तर्फे युक्तिवाद करताना ॲड. डॉ. उदय वरुणिकर यांनी असा युक्तिवाद केला की, धर्मशास्त्रानुसार गणेशमूर्तींचे विसर्जन करणे ही एक अनिवार्य धार्मिक प्रथा आहे आणि या पर्यायांमुळे भाविकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा येऊ शकते.

मात्र, यावर तीव्र आक्षेप घेत न्यायमूर्ती कमल खाता यांनी स्पष्ट केले, "आम्ही मूर्तींच्या उंचीच्या विरोधात अजिबात नाही... तुम्हाला हवे तेवढ्या उंचीच्या मूर्ती आणा, पूजा करा; पण आमचे म्हणणे फक्त इतकेच आहे की, त्यांचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करू नका. यामुळे



आपल्या पर्यावरणाला आणि भावी पिढ्याना हानी पोहोचत आहे... यामुळे कोणत्याही धार्मिक भावना दुखावल्या जात नाहीत." तसेच, धर्मशास्त्रात कुठे लिहिले आहे की मूर्तींचे नैसर्गिक पाण्यातच विसर्जन करणे अनिवार्य आहे, असा सवालही न्यायालयाने केला.

न्यायमूर्ती अजय गडकरी यांनी सुनावणीदरम्यान आठवण करून दिली की, नागरिकांना जसे मूलभूत अधिकार आहेत, तसेच त्यांची काही मूलभूत कर्तव्येही आहेत. केवळ अधिकार महत्त्वाचे नसून कर्तव्यांचीही जाणीव ठेवली पाहिजे. यावर उत्सव समितीच्या वतीने सांगण्यात आले की, प्रदूषणाचे मूळ कारण POP नसून त्यावर वापरले जाणारे रासायनिक रंग आहेत. त्यावर बंदी घालावी आणि पर्यावरणपूरक रंगांना प्रोत्साहन द्यावे, अशी भूमिका मांडण्यात आली. दरम्यान, राज्याचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे यांनी न्यायालयाला माहिती दिली की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात POP च्या मूर्तींऐवजी पर्यावरणपूरक मूर्ती वापरण्याचे जे आवाहन केले आहे, त्यासंदर्भात राज्य सरकार शुक्रवारपासून विशेष बैठका घेऊन धोरणात्मक चर्चा करणार आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी सुरू आहे.

# न्यायालयात आरोपींचे हॉटेलिंग,नशेखोरी?

## पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांचे शिवाजीनगर न्यायालयात सुरक्षा ऑडीट चे निर्देश

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

शिवाजीनगर न्यायालय परिसरातून एक अत्यंत धक्कादायक बाब समोर आली आहे. न्यायालयात हजर करण्याच्या नावाखाली आरोपींकडून सुरू असलेल्या मनमानी कारभाराला आणि 'टुरिझम'ला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. न्यायालय परिसरात आरोपींना मिळणारी अवाजवी मोकळीक, नातेवाईकांसोबत होणाऱ्या बिनधास्त भेटी आणि अगदी हॉटेलमधून जेवण मागवण्यासारखे प्रकार आता पोलिसांच्या रडारवर आले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी सुरक्षेचा तातडीने आढावा घेत कडक निर्देश जारी केले आहेत.

**आरोपींच्या 'टुरिझम'ला पायी 'ब्रेक'**

न्यायालयात तारीख व सुनावणीच्या निमित्ताने येणाऱ्या कैद्यांना किंवा आरोपींना कायद्याचा धाक राहिला नसल्याचे चित्र दिसत आहे. आरोपींना न्यायालयात आणणे म्हणजे जणू काही त्यांच्यासाठी एक 'पर्यटन'च बनल्याची खंत पोलीस प्रशासनाने व्यक्त केली आहे. या संदर्भात बोलताना




पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी स्पष्ट केले की, आरोपींना न्यायालयात आणण्याची प्रक्रिया त्यांच्यासाठी पर्यटन ठरू नये, यासाठी प्रशासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे. आरोपींना थेट कोर्टात हजर करून तात्काळ पुन्हा कारागृहात किंवा पोलीस कोठडीत हलवले जाईल. या प्रक्रियेत पोलिसांशिवाय इतर कोणालाही आरोपींच्या संपर्कात येण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**शौचालयात गांजा पुरवल्याची घटना उघड**

काही दिवसांपूर्वीच न्यायालयाच्या परिसरातील शौचालयात एका आरोपीला त्याच्या मित्राने गांजा पुरवल्याची गंभीर घटना उघडकीस आली होती. या घटनेमुळे न्यायालयीन सुरक्षेतील प्रचंड त्रुटी चव्हाट्यावर आल्या. आरोपी मोबाईलवर गप्पा मारणे, वाहनांमध्ये बसून वेळ घालवणे, सोशल मीडियासाठी रील्स तयार करणे आणि अगदी अमली पदार्थांची देवाणघेवाण करणे असले प्रकार करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

**सुरक्षा व्यवस्थेत होणार मोठे बदल**

व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर: सुरक्षेवरील ताण कमी करण्यासाठी आणि आरोपींची अनावश्यक ये-जा थांबवण्यासाठी अधिकाधिक सुनावण्या दृकश्राव्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) घेण्यावर भर दिला जाणार आहे.

**कडक तपासणी:** मेट्रोचे काम आणि इतर कारणांमुळे सुरक्षेत जी शिथिलता आली होती, ती तातडीने दूर केली जात असून आता प्रवेशद्वारावर प्रत्येकाची कसून तपासणी केली जाईल.

**झीरो टॉलरन्स:** न्यायालय परिसरात पान, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ किंवा कोणतीही संशयास्पद वस्तू आणण्याचा प्रयत्न केल्यास तो अजिबात खपवून घेतला जाणार नाही, असा कडक इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

यापूर्वी चतुःशृंगी, कोथरूड आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यांमध्ये खुनाचा प्रयत्न व विनयभंगासारखे गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत आरोपी अनमोल जाधवराव (वय ३६) याला १९ जुलै २०२५ रोजी न्यायालयीन सुनावणीसाठी शिवाजीनगर न्यायालयात आणण्यात आले होते. न्यायालयाने त्याला एका खटल्यात शिक्षा सुनावताच, तो संधी साधून न्यायालयाच्या आवारातील गर्दीतून पसार झाला.

या घटनेनंतर पोलिसांनी शोधमोहिम राबवली असता, हा आरोपी पोलिसांना सतत गुंगारा देत असल्याचे समोर आले. दूरचित्रवाहिनीवरील (टीव्ही) गुन्हेगारी मालिका पाहून तो आपली वेशभूषा बदलत असे आणि सातत्याने वास्तव, तसेच राहण्याचे ठिकाण बदलून पोलिसांची दिशाभूल करत होता. अखर कसून तपास केल्यानंतर पोलिसांनी त्याला अहिल्यानगरमधून वाघोलीकडे मोटारीतून येत असताना जेरबंद केले. त्याच्यासोबत असणारा अक्षय हंपे (वय ३०) या अन्य एका साथीदारालाही पोलिसांनी गजाआड केले आहे.

**पूर्वीच्या घटना आणि सुरक्षेपुढील आव्हाने**

फक्त हाच नव्हे, तर यापूर्वीही १९ मार्च २०२३ रोजी शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातून एका वॉरंटमधील आरोपी दीपक शिवाजी जाधव (वय २८) याने न्यायालयातून सुनावणीदरम्यान पळ काढत चक्क वीस फूट उंचीवरून उडी मारून पसार होण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तिथे उपस्थित असलेल्या सतर्क पोलीस हवालदार सचिन शिंदे आणि इतर बंदोबस्तावरील कर्मचाऱ्यांनी धाव घेऊन त्याला पुन्हा शिताफीने पकडले होते.

# ‘महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा, २०२६’ अंमलात

## बळजबरी किंवा फसवणुकीने धर्मांतर, १० वर्षांपर्यंतच्या शिक्षा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्रात राज्याचा बहुप्रतिक्षित धर्मांतर विरोधी कायदा आता अधिकृतपणे लागू झाला आहे. ‘महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य कायदा, २०२६’ असे नाव असलेला हा कायदा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची मंजुरी मिळाल्यानंतर शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आला असून, ३० जुलैपासून तो राज्यभरात लागू झाला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे आता बेकायदेशीर व सक्तीच्या धर्मांतराबाबत कठोर कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

हा कायदा मार्च महिन्यात झालेल्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संमत करण्यात आला होता. त्यानंतर तो मंजुरीसाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर ३० जुलै रोजी राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाले आणि त्याच दिवशी त्याची अंमलबजावणी सुरू झाली, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.



“या नव्या कायद्याच्या तरतुदींनुसार, सक्तीने किंवा फसवणुकीने होणाऱ्या धार्मिक धर्मांतरांवर कठोर कारवाई केली जाईल. बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा विवाहाच्या आमिषापोटी घडवून आणल्या जाणाऱ्या धर्मांतरांना या कायद्यान्वये प्रतिबंधित करण्यात आले आहे.”

नवीन कायद्यानुसार, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना ७ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते, जी पुनरावृत्ती करणाऱ्या गुन्हेगारांसाठी वाढवून १० वर्षांपर्यंत असू शकते. तसेच, धर्मांतर करण्यापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी पूर्वसूचना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, धर्मांतरित व्यक्तीचे आई-वडील, बहीण-भाऊ किंवा इतर नातेवाईक यांनाही या प्रकरणी तक्रार दाखल करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

विधानसभेत हा कायदा मांडला गेला तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट), समाजवादी पक्ष आणि सीपीएम या पक्षांनी याला विरोध केला होता, तर शिवसेना (यूबीटी) ने याला पाठिंबा दिला होता. काँग्रेसच्या आमदारांनी हा कायदा असंविधानिक आणि गोपनीयतेच्या हक्काचे उल्लंघन करणारा असल्याचे म्हटले होते, तर समाजवादी पक्षाने हा कायदा एका विशिष्ट समुदायाला लक्ष करून केला असल्याचा आरोप केला होता. विरोधी पक्षांनी हा कायदा संयुक्त प्रवर समितीकडे पाठवण्याची मागणी केली होती.

या कायद्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले होते की, हा कायदा सक्तीचे किंवा फसवणुकीचे धर्मांतर रोखण्यासाठी आहे आणि याचा उद्देश स्वेच्छेने होणारे धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाहांच्या विरोधात नाही. महाराष्ट्रापूर्वी देशातील किमान १२ इतर राज्यांमध्ये असा धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात आहे.

## प्लॉट खरेदीचे पैसे परत करताना धनादेश बाऊन्स

प्लॉट खरेदीसाठी घेतलेली रक्कम प्रकल्प रद्द झाल्यानंतर परत करण्यासाठी दिलेले धनादेश बाऊन्स करून ग्राहकाला मानसिक व आर्थिक त्रास दिल्याप्रकरणी एका बांधकाम व्यावसायिकाला (बिल्डरला) ग्राहक आयोगाने मोठा दणका दिला आहे. ग्राहक आयोगाने संबंधित बिल्डरला ग्राहकाचे उरलेले ३ लाख ३६ हजार रुपये वार्षिक ९ टक्के व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत.

पुण्याच्या अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अरुण गायकवाड, सदस्य प्रणाली सावंत आणि कांचन गंगाधरे यांनी हा निकाल दिला आहे. या प्रकरणात ग्राहकाला झालेला मानसिक त्रास आणि तक्रार खर्चाची भरपाई म्हणून अतिरिक्त ४० हजार रुपये देण्याचे आदेशही बिल्डरला देण्यात आले आहेत.

चिंचवड येथील रहिवासी असलेल्या मधूसुदन प्रल्हाद जोशी यांनी ‘श्री बालाजी डेवलपर्स’चे मालक राजेश सूरजमल भंडारी यांच्याविरोधात ग्राहक आयोगात दाद मागितली होती. तक्रारदाराच्यावतीने ॲड. श्रीराम करंदीकर यांनी बाजू मांडली. मिळालेल्या माहितीनुसार, बांधकाम व्यावसायिकाच्या ‘कोकण वैभव’ या प्रकल्पात ११ गुंठे क्षेत्राचा भूखंड आरक्षित केला होता. यासाठी तक्रारदाराने २०२० ते २०२१ या कालावधीत टप्प्याटप्प्याने ३ लाख रुपये जमा केले. मात्र, काही कारणास्तव बिल्डरने हा प्रकल्प रद्द केला. नियमानुसार ग्राहकाची संपूर्ण रक्कम परत करणे हे बिल्डरचे कायदेशीर कर्तव्य होते.

# चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार आणि खून; नराधमाला फाशी

## ‘अति विरळा प्रकरणांमधील’ गुन्हा ठरवत, सांगली सत्र न्यायालयाने ठोठावला मृत्युदंड

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात घडलेल्या अत्यंत अंगावर काटा आणणाऱ्या आणि मानवी मन सुन्न करणाऱ्या चार वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचार व खून प्रकरणाचा न्याय निवाडा शनिवारी सांगलीच्या सत्र न्यायालयाने केला आहे. न्यायालयाने या गुन्ह्याला ‘अति विरळा’ (RARE OF RARE) प्रकरणाची वर्गवारी देत, ४५ वर्षीय नराधम आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. या निकालामुळे संपूर्ण जिल्ह्यातून समाधान व्यक्त होत असून महिला व बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. ए. मोहंती यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. सरकारी पक्षाने मांडलेला युक्तिवाद आणि गुन्ह्याची क्रूरता लक्षात घेता, या गुन्ह्यात आरोपीला कठोर ते कठोर शिक्षा मिळणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. आरोपी पांडुरंग सोमन्ना कल्ला असे या फाशीची शिक्षा सुनावलेल्या दोषी नराधमाचे नाव आहे.

“आरोपीने आपल्यातील राक्षसी प्रवृत्ती एका निष्पाप, असहाय्य आणि बचावासाठी असमर्थ असलेल्या बालकावर मोकळी सोडली. आरोपीच्या या कृत्याने समाजाची सामूहिक सद्सद्विवेकबुद्धी सुन्न केली आहे. गुन्ह्याची अत्यंत हिंस्र व बार्बर पद्धत पाहता, अल्पवयीन पिडितेचे वय अवघे ४ वर्षे २ महिने १४ दिवस असल्याचा विचार करता, मऊच्या बाजूंपेक्षा गुन्ह्याचे गांभीर्य आणि क्रूरता कैक पटीने मोठी ठरते,” असे निरीक्षण न्यायालयाने आपल्या आदेशात नोंदवले आहे.

पोलिसांनी व सरकारी पक्षाने दिलेल्या माहितीनुसार, घटना घडली त्या दिवशी पिडीत बालिका आपल्या घराबाहेर आठ वर्षांच्या नातेवाइकासोबत खेळत होती. इतर मूल शाळेत निघून गेल्यानंतर, आरोपी कल्ला याने त्या चिमुरडीला धोक्याने आपल्या घरात नेले. तिथे तिच्यावर अतिप्रसंग करत अत्यंत गंभीर दुखापती पोहोचवून तिचा खून केला.

त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने मृतदेह एका पोत्यात कोंबून आपल्या घरातील एका लोखंडी पेटीत लपवून ठेवला होता.

या खटल्यात सरकारी वकील म्हणून काम पाहणारे जिल्हा सरकारी वकील प्रमोद भोकरे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने बीएनएस, २०२३ च्या कलमांनुसार आणि पॉक्सो कायद्याच्या विविध गंभीर कलमांनुसार आरोपीला दोषी ठरवले. खटल्यादरम्यान परिस्थितीजन्य पुराव्यांची साखळी अत्यंत कुशलतेने जुळवण्यात आली होती. मयताची बहीण (चुलत बहीण) आणि एक स्वतंत्र साक्षीदार हे या खटल्यातील महत्त्वाचे ‘शेवटचे एकत्र दिसलेले’ साक्षीदार ठरले, ज्यांच्या पुराव्यामुळे गुन्ह्याची साखळी सिद्ध होण्यास मोठी मदत झाली. सत्र न्यायालयाने सुनावलेली ही फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आली आहे. या खटल्याच्या जलद गतीने लागलेल्या निकालामुळे न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# पत्नीवर हल्ला करणाऱ्या ७ वर्षे कारावासाची शिक्षा

## बारामती सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्या डोक्यात लोखंडी हातोड्याने वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला बारामती येथील मे. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौ. श्रीमती एस. आर. पाटील यांनी ७ वर्षे सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

दिनांक १५ जुलै २०२० रोजी आरोपी विलास दादा नेटके (रा. सहजपूर, ता. दौंड, जि. पुणे) याने त्याची पत्नी ललीता विलास नेटके हिच्या चारित्र्याबद्दल संशय घेतला. या संशयातून तिची विक्षिप्त मार्गाने विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने तिच्या डोक्याच्या उजव्या बाजूस हातातील लोखंडी हातोड्याने जबर दुखापत करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी यवत पोलीस स्टेशनमध्ये आप्पा सुदाम सकट यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्याचा तात्कालीन तपास अधिकारी एन. एस. लकडे यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदर खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण ०९ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये जखमी पत्नी ललीता नेटके, मुलगा सुमेश आणि डॉक्टर शलाका लोणकर यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील सुनील ईश्वर वसेकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. न्यायालयाने वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब ग्राह्य धरून आरोपी विलास नेटके याला भारतीय दंड संहितेच्या (भा.द.वि.) कलम ३०७ नुसार ७ वर्षे सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास तसेच कलम ३२३ नुसार ६ महिने शिक्षेची तरतूद केली आहे.




या खटल्याच्या यशस्वी तपासात यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी किशोर वागज यांनी केस अधिकारी म्हणून तर पोलीस हवालदार वेणूनाद ढोपरे यांनी सहकार्य केले. तसेच पो.स.ई. गोरख कसपटे आणि सहाय्यक फौजदार ए. जे. कवडे यांनी पैरवी अधिकारी म्हणून उत्कृष्ट कामकाज पाहिले.

# डबल डिलाईट! एकाच दिवशी मिळाले दोन विजय!

अ‍ॅड. गीतांजली कडते या पुण्यात वकील म्हणून प्रॅक्टीस करत असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि युनियन बँक ऑफ इंडियाच्या पॅनेल अ‍ॅडव्होकेट म्हणूनही कार्यरत आहेत. सुप्रीम कोर्टाच्या सर्टिफाईड मीडिएटर असण्यासोबतच सामाजिक जाणिवेतून त्यांनी 'गीतांजली सोशल फाउंडेशन'ची स्थापना केली आहे. त्याद्वारे विविध सामाजिक उपक्रम राबवतात. **अ‍ॅड. गीतांजली कडते** नुकतेच कॉलेज संपून पहिल्यांदाच कोर्टात उतरल्या तेव्हा एका साध्या ज्युनिअर वकिलासाठी तो काळ मोठा कसोटीचा होता. एकाच दिवशी त्यांच्यासमोर दोन पूर्णपणे वेगळी प्रकरणे आलीएक जिल्हा न्यायालयातील दिवाणी अपील आणि दुसरे कौटुंबिक न्यायालयातील घटस्फोटाचे प्रकरण. त्या एकाच दिवसात मिळालेल्या दोन विजयांनी आणि अनुभवांनी त्यांच्या संपूर्ण करिअरला आणि आयुष्याला एक नवी दिशा दिली.






अ‍ॅड. गीतांजली कडते

**पहिले प्रकरण: शाळा आणि जनावरांच्या शेडचा कायदेशीर वाद**

पहिले प्रकरण एका नामांकित शाळा आणि एका परवानाधारक जनावरांच्या शेडचा मालक यांच्यातील अत्यंत गुंतागुंतीच्या कायदेशीर वादाचे होते. ट्रायल कोर्टात तो खटला माझा पक्षकार पूर्णपणे हरला होता. त्या शेडच्या मालकाकडे सर्व अधिकृत परवानग्या असतानाही, शेजारी शाळा आल्यामुळे त्याच्या रोजगारावर आणि अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. खालच्या कोर्टात बाजू कमजोर पडल्यामुळे पक्षकार पूर्णपणे निराश झाला होता.

अशातच माझ्या सिनिअर वकिलांनी तो फाईलचा मोठा डोंगर माझ्या टेबलवर ठेवला आणि अचानक एका दिवशी मला अत्यंत सहजपणे सांगितले की हे अपील आता मलाच युक्तिवाद करून चालवायचे आहे. ते शब्द ऐकून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी मनातल्या मनात विचार करू लागले की, ज्या प्रकरणात माझ्यापेक्षा सीनिअरही हरलेत, तिथे माझ्यासारखी अनुनभवी ज्युनिअर ते कठीण अपील कशी लढवणार? पण माझ्या सिनिअरचा माझ्यावरील तो दृढ विश्वासच माझी सर्वात मोठी ताकद बनला. त्यांनी माझ्यावर जो भरोसा दाखवला, त्याने मला आतून हलवून सोडले आणि एक नवीन उमेद दिली.

मी त्या फाईलचे पानोपान अक्षरशः पाठ करून टाकले होते. झोप उडवणारे ते दिवस आणि रात्री आजही माझ्या मनातून जात नाहीत. कोर्टात पोहोचल्यावर मला समजले कि नुसता अभ्यास चालत नाही, तर आधी बऱ्याच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. जेव्हा शेवटी माझा नंबर

> ***"एक सीनियर वकिल ज्या प्रकरणात आधीच हरला होता, ते अपील माझ्यासारख्या नवशिक्या ज्युनिअरने लढवावे, असा विश्वास माझ्यावर दाखवला गेला. त्या एका विश्वासाने माझे संपूर्ण आयुष्य आणि दृष्टिकोन बदलून टाकले."***

आला, तेव्हा माझा संपूर्ण थरकाप उडाला होता. सिनिअरनी न्यायाधीशांची औपचारिक ओळख करून देत विनंती केली की मला युक्तिवाद करू द्यावा. माननीय न्यायाधीशांनी संमती दिली, पण त्यानंतर त्यांच्या प्रश्नांचा जो भडिमार सुरू झाला, तो एखाद्या कठीण परीक्षेसारखाच होता.

त्या वादाचा मूळ मुद्दा अत्यंत साधा पण कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाचा होताएखादी शाळा बाजूला आली म्हणून कायदेशीर परवानगी घेऊन कायदेशीर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या रोजगारापासून वंचित ठेवले जाऊ शकते का? मी न्यायाधीशांसमोर युक्तिवाद करताना एक अगदी व्यावहारिक आणि साधे उदाहरण दिले, जे आजसुद्धा लोक लक्षात ठेवून कौतुक करतात. मी आत्मविश्वासाने म्हटले, "माय लॉर्ड, शेडमधील गाई-म्हशी काही कंपाऊंड वॉल उडी मारून शाळेत जाणार नाहीत!" दोन्ही बाजूंना एक भक्कम भिंत असताना हा युक्तिवाद अत्यंत तंतोतंत बसला.

त्या एका साध्या, कॉमन सेन्सच्या मुद्द्याने न्यायालयाचे मन जिंकले. आणि जेव्हा अपील मंजूर होऊन निकाल माझ्या बाजूने लागला, तेव्हा मला समजले कि वकिलीत अनुभवापेक्षा तुमची तयारी, प्रत्येक मुद्द्यातील स्पष्टता आणि प्रामाणिकपणा जास्त महत्त्वाचा असतो.

**दुसरे प्रकरण: संवेदनशील घटस्फोटाचा दावा**

दुसरीकडे, मी एका अत्यंत कठीण आणि क्लिष्ट घटस्फोटाच्या प्रकरणावरही एकाच वेळी काम करत होते. एकीकडे संविधानिक आणि दिवाणी कायदे समजून घेत असताना, दुसरीकडे मानवी भावनांच्या गुंतागुंतीशी मला सामना करावा लागत होता. तो पती-पत्नीचा वाद अतिशय विकोपाला गेला होता; पतीला आपले आयुष्य नवीन मार्गाने पुढे न्यायचे होते, तर कौटुंबिक व सामाजिक दबावामुळे नाते पूर्णपणे संपुष्टात येत होते. दोन्ही बाजूंनी अनेक प्रयत्न करूनही जेव्हा तडजोड शक्य झाली नाही, तेव्हा कायदेशीर लढा अनिवार्य ठरला.

> ***"ती महिला कोर्टाबाहेर अश्रू ढाळत आली आणि तिने मला प्रेमाने ५०० रुपयांची नोट दिली. ती नोट माझ्या वकिलीच्या प्रवासातील आजवरची सर्वात मोठी कमाई आणि नेहमी जपून ठेवलेली अनमोल पावती आहे."***

मी त्या पती-पत्नीच्या किंवा कुटुंबाच्या वादात तासनतास समेट घडवण्याचा किंवा कायदेशीर बाजू समर्थपणे मांडण्याचा प्रयत्न करत होते. त्या खटल्यात कायदेशीर मुद्द्यांपेक्षा मानसिक ताणतणाव आणि संवेदनशीलता जास्त हाताळावी लागत होती.

माझा पहिला खटला

आणि खऱ्या अर्थाने योगायोग असा घडला कि, त्या दोन्ही भिन्न प्रकरणांचे निकाल अगदी एकाच दिवशी माझ्या बाजूने लागले!

अपील मंजूर झाले आणि घटस्फोटाचा दावाही माझ्या पक्षकाराला अनुकूल असा सुटला. कोर्टाबाहेर आल्यावर त्या घटस्फोट झालेल्या पुरुष अशिलाची आई डोळ्यांत अश्रू आणत माझ्याकडे धावत आली. तिने माझे दोन्ही हात हातात घेतले, मला भरभरून आशीर्वाद दिले आणि तिच्या पर्समधून काढून एक ५०० रुपयांची नोट माझ्या हातात जबरदस्तीने सरकवली. मी ती नाकारण्याचा प्रयत्न केला असता ती प्रेमाने म्हणाली, "ही फी म्हणून नाही तर तुझी आईच समजून आशीर्वाद म्हणून ठेव!" मी ती पाचशे रुपयांची नोट आजही अतिशय जपून ठेवली आहे, कारण ती मला माझ्या वकिलीचे खरे आणि सर्वोच्च मूल्य शिकवून जाते.

दुसऱ्या दिवशी तो शेडचा मालक माझ्या ऑफिसमध्ये पेढे घेऊन आला, आणि खऱ्या अर्थाने त्याच्या जनावरांच्या मूक आशीर्वादांशिवाय तो आनंद अपूर्ण राहिला असता. त्या दोन्ही घटनांनी मला शिकवले की, पक्षकार तुमचं कायदेशीर कलमी भाषण कधीतरी विसरू शकतात, पण जेव्हा त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळायची होती, तेव्हा तुम्ही त्यांच्या पाठीशी कसे खंबीरपणे उभे राहिलात, हे ते कधीही विसरत नाहीत. वकिली म्हणजे फक्त पुस्तकी कायदेतज्ज्ञ असणे नव्हे, तर माणसांचे दुःख जवळून समजून घेण्याची एक अतिशय संवेदनशील कला आहे.

**शब्दांकन : अ‍ॅड. रुची मेमाणे**

# विमा नाही तर पेट्रोल मिळणार नाही?

## ५६ टक्के वाहने विना-विमा; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, वाहनांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

जर तुमच्या गाडीचा विमा काढलेला नसेल, तर लवकरच तुम्हाला पेट्रोल पंपावर पेट्रोल मिळणे कठीण होऊ शकते. देशाच्या रस्त्यांवर विमेशिवाय धावणाऱ्या गाड्यांच्या समस्येवर कडक उपाय काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. न्यायालयाने असे सुचवले आहे की, महामार्ग आणि रस्त्यांवर लावण्यात आलेल्या कॅमेऱ्यांच्या मदतीने विम्याशिवाय धावणाऱ्या गाड्यांची ओळख पटवली जावी आणि त्यांच्या मालकांना दंडाची (चलान) पावती पाठवली जावी.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने देशातील रस्त्यांवर धावणाऱ्या जवळपास ५६ टक्के गाड्यांकडे विमा नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. यामध्ये बहुतांश गाड्या या दुचाकी आहेत. मोटार वाहन कायद्यातील कलम १४६ नुसार गाडीचा विमा सक्तीचा ठेवण्याचा मुख्य उद्देश यामुळे निष्प्रभ होत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. यामुळे रस्ते अपघातात जखमी झालेल्या किंवा जीव गमावलेल्या लोकांच्या कुटुंबियांना भरपाई मिळवण्यासाठी दीर्घकाळ कोर्टात लढा द्यावा लागतो.



**कडक नियमांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना:**

दंडाची पावती आणि रस्ते सुरक्षा व्यवस्थापनासाठी असलेली सध्याची यंत्रणा डिजिटल प्रणालीशी जोडली जावी, जेणेकरून विमा नियमांचे पालन काटेकोरपणे होईल.

ज्या गाड्यांकडे वैध विमा आहे, त्यांनाच पेट्रोल मिळण्यासाठी एक विशेष प्रायोगिक प्रकल्प सुरू केला जावा.

महामार्ग आणि रस्त्यांवरून जाणाऱ्या गाड्यांची स्वयंचलित ओळख पटवून टोल नाक्यांवर गाड्या थाम्बवण्याची पद्धत बदलली जावी. नागरिकांना त्यांच्या गाडीची विम्याची स्थिती सोप्या पद्धतीने तपासता यावी, असा प्रकल्प सुरू केला जाईल.

विमा कंपन्यांच्या वेबसाईटवर सर्वसमावेशक वाहन विम्याचे फायदे सोप्या भाषेत दाखवले जावेत. वाहतूक पोलिसांना गाड्यांच्या विम्याची थेट माहिती तपासण्यासाठी आणि नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी हातात घेता येणारी उपकरणे (हँडहेल्ड डिव्हाइस) दिली जावीत. सरकारी आकडेवारीनुसार, एकूण रस्ते अपघातांपैकी २२ टक्के अपघात हे विम्याशिवाय चालवल्या जाणाऱ्या गाड्यांमुळे होतात. मोटार वाहन कायद्यानुसार, ज्या व्यक्ती गाडीचा तिसऱ्या पक्षाचा (थर्ड पार्टी) विमा काढलेला नसतानाही गाडी चालवतात किंवा चालवू देतात, त्यांना शिक्षा होऊ शकते. पहिल्या गुन्ह्यासाठी तीन महिन्यांपर्यंत तुरुंगवास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी चार महिन्यांपर्यंत तुरुंगवास, किंवा चार हजार रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. पेट्रोल पंपांवर वैध विमा नसलेल्या गाड्यांना पेट्रोल देण्यास प्रतिबंध करण्याबाबत, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचा यावर कोणताही विरोध नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. जोपर्यंत गाडीचा विमा काढला जात नाही, तोपर्यंत पेट्रोल पंपांवर अशा गाड्यांना इंधन दिले जाणार नाही. यामुळे विम्याशिवाय चालणाऱ्या किंवा नोंदणी नसलेल्या गाड्या ओळखणे सोपे होईल आणि वाहनमालक स्वतःहून आपल्या गाडीचा विमा काढतील. अशा प्रकल्पांमुळे कायद्याची कडक अंमलबजावणी होण्यास मदत होईल.

कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य वाहतूक पोलिसांना विमा माहितीच्या डेटाशी जोडलेली हातातली उपकरणे किंवा मोबाईल ॲप्स दिले जावेत, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. "विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (IRDAI) हे सुनिश्चित केले पाहिजे की, विमा माहिती प्रणालीच्या डेटाशी जोडलेली ही उपकरणे किंवा ॲप्स वाहतूक पोलिसांकडे उपलब्ध असतील," असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# आरोपीची दोरी बांधून काढली धिंड

## मानवाधिकार आयोगाचा पुणे पोलीस आयुक्तांना दणका; न्यायमूर्ती ए. एम. बदर यांचे ताशेरे

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

येरवड्यातील लक्ष्मी नगर भागात एका २० वर्षीय तरुणाला वाहने तोडफोड केल्याच्या संशयावरून सार्वजनिक ठिकाणी मानहानीकारक वागणूक देत मारहाण करण्यात आली. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने (MSHRC) अत्यंत गंभीर दखल घेत मुख्य सचिव, पुणे पोलीस आयुक्त आणि पोलीस ठाण्यातील ११ इतर पोलीस अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. कायद्याचे योग्य पालन करण्याऐवजी पोलिसांनी प्रत्यक्षात 'शारीरिक शिक्षा' लादल्याचे ताशेरे आयोगाने ओढले असून, यावर उत्तर देण्यासाठी मुख्य सचिवांना 'मुभा' देण्यात आली आहे.

लक्ष्मीनगर भागात सुलतान शेख (वय २०) या तरुणाला वाहने तोडफोड केल्याच्या संशयावरून काही स्थानिक रहिवाशांनी पकडले होते. यानंतर त्याला परिसरातील रहिवाशांसमोर आणून त्याची धिंड काढण्यात आली. इतकेच नव्हे तर, त्याला सार्वजनिक ठिकाणी मारहाण करत लोकांची माफी मागण्यास भाग पाडण्यात आले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.

स्थानिक रहिवासी तानाजी करचे आणि स्वप्नील जाधव यांनी या अमानुष घटनेविरोधात मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. आपण या घटनेचा व्हिडिओ रेकॉर्ड केल्याचे तक्रारदार तानाजी कारचे यांनी नमूद केले असून, स्थानिक रहिवाशांनी सुलतान



शेखची दोरीने हात बांधून धिंड काढली, त्याला उठाबशा काढायला लावल्या आणि सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करत मारहाण केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एम. बदार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सुनावणी करताना पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. तक्रारी आणि जोडलेल्या छायाचित्रांचा संदर्भ देत आयोगाने म्हटले आहे की, पुणे पोलीस दलाने कायद्याच्या प्रक्रियेचे पालन करण्याऐवजी पीडित तरुणावर 'शारीरिक शिक्षा' लादली आहे. हा प्रकार प्रथमदर्शनी मानवी अधिकारांचे उल्लंघन करणारा असल्याचे आयोगाने नमूद केले.

आयोगाच्या आदेशानुसार, मुख्य सचिवांना या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आगामी ९ सप्टेंबर रोजी निश्चित करण्यात आली आहे.



# सायबर फ्रॉड : बँकांची मनमानी आता बंद!

## मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय, डिजिटल युगात बँकांना जबाबदारी टाळता येणार नाही, ग्राहकांना मोठा दिलासा

*आजच्या डिजिटल आणि ऑनलाइन बँकिंगच्या युगात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. बँक खात्यातून पैसे चोरीला गेल्यास सर्वसामान्यांना मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते. अशाच एका गंभीर आणि बहुचर्चित प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने ६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयाने बँक ग्राहकांसाठी आशेचा नवीन किरण दाखवला आहे. 'सुबोध सी. कोर्डे विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर' या खटल्यातील हा निकाल डिजिटल बँकिंगच्या सुरक्षिततेच्या आणि कायदेशीर उत्तरदायित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.*




पुण्यातील रहिवासी असलेल्या सुबोध सी. कोर्डे यांच्या एचडीएफसी बँकेच्या खात्यातून अवघ्या ४१ मिनिटांच्या आत तब्बल ३८ लाख ४ हजार रुपयांची अनाधिकृत रक्कम काढण्यात आली. एकापाठोपाठ एक अशा आठ ऑनलाइन व्यवहारांद्वारे ही मोठी रक्कम गायब झाली. विशेष म्हणजे, तक्रारदाराच्या नकळत व संमतीशिवाय त्यांच्या खात्यात नवीन लाभार्थी जोडण्यात आले आणि ऑनलाइन व्यवहाराची मर्यादा ४ लाखांवरून थेट ४० लाखांपर्यंत वाढवण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत कोणतेही 'वन टाईम पासवर्ड' (OTP) प्राप्त झाले नसल्याचा दावा त्यांनी केला होता.



**ॲड. नीरज जगताप**
**सायबर कायदेतज्ज्ञ**

या प्रकरणी वाकड पोलिसांनी सखोल तपासणी केल्यानंतर, तक्रारदाराची कोणतीही कुचराई किंवा निष्काळजीपणा नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) नियमांनुसार फसवणूक झालेली सर्व रक्कम ग्राहकाला तात्काळ परत करण्यात अशी स्पष्ट विनंती पोलिसांनी बँकेला केली होती.

### न्यायालयापुढील महत्त्वाचे मुद्दे आणि कायदेशीर युक्तिवाद

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरबीआयच्या ६ जुलै २०१७ रोजीच्या 'कस्टमर प्रोटेक्शन – लिमिटिंग लायबिलिटी ऑफ कस्टमर्स इन अनाधिकृत इलेक्ट्रॉनिक ट्रान्झॅक्शन्स' या परिपत्रकावर मुख्य भर देण्यात आला. न्यायालयासमोर दोन्ही बाजूंकडून खालीलप्रमाणे मुद्दे मांडण्यात आले:

**शून्य ग्राहक जबाबदारी:** जर सायबर फसवणूक ही बँकेच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्यांच्या सुरक्षा प्रणालीतील त्रुटींमुळे झाली असेल, तर ग्राहकाची कोणतीही आर्थिक जबाबदारी राहत नाही, असा नियम या प्रकरणात लागू होतो.

**पुराव्याचा भार:** ग्राहकाने दुर्लक्ष केल्याचे किंवा त्याची कोणतीही चूक असल्याचे सिद्ध करण्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी बँकेवर असते, ग्राहकावर नाही.

**बँकेचा युक्तिवाद:** एचडीएफसी बँकेने हा करारविषयक वाद असल्याने रिट याचिका दाखल करण्यायोग्य नसल्याचा प्राथमिक मुद्दा उपस्थित केला. तसेच, ओटीपी यशस्वीपणे पाठवले गेले होते आणि संबंधित व्यवहार ग्राहकाच्या नोंदणीकृत डिव्हाइसवरूनच झाले होते, असे बँकेचे म्हणणे होते.

### सर्वसामान्यांसाठी काय?

मुंबई उच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे बँकांच्या बेजबाबदार आणि ढिसाळ कारभाराला मोठा कायदेशीर आळा बसणार आहे. आरबीआयच्या नियमांनुसार, जर सायबर फसवणुकीत ग्राहकाची कोणतीही प्रत्यक्ष चूक किंवा निष्काळजीपणा नसेल आणि बँक किंवा त्यांच्या डिजिटल सुरक्षेतील त्रुटींमुळे पैसे गेले असतील, तर ग्राहकाला कोणताही भुर्दंड सहन करावा लागणार नाही. बँकांना ठराविक मुदतीत संपूर्ण रक्कम परत करावी लागेल. सर्वसामान्यांसाठी हा निकाल अत्यंत फायदेशीर आणि दिलासादायक ठरला आहे, कारण यामुळे 'डिजिटल फसवणुकीची सर्व जबाबदारी आणि ताण नेहमी ग्राहकाचाच असतो' हा बँकांचा जुना समज पूर्णपणे खोटा ठरला आहे. आता बँकांना त्यांच्या अंतर्गत सुरक्षा यंत्रणा अधिक भक्कम कराव्या लागतील आणि ग्राहकांच्या पैशांच्या सुरक्षेची अधिक नैतिक व कायदेशीर जबाबदारी स्वीकारावी लागेल. हा निकाल प्रत्येक ऑनलाइन बँकिंग वापरणाऱ्या सामान्य नागरिकाच्या हक्कांचे आणि आर्थिक सुरक्षिततेचे खऱ्या अर्थाने मजबूत संरक्षण करतो.

### अंतर्गत यंत्रणेचे अपयश आणि न्यायालयाचे गंभीर निरीक्षण

या संपूर्ण खटल्यातील सर्वात धक्कादायक आणि महत्त्वाची बाब म्हणजे, बँकेच्या स्वतःच्या अंतर्गत फसवणूक सनियंत्रण प्रणालीने (Internal Fraud Monitoring System) संशयित व्यवहार आधीच ओळखले होते. नवीन लाभार्थी जोडताना प्रणालीने धोक्याची घंटा वाजवली होती आणि ते लाभार्थी जोडण्यास स्पष्ट मनाई करण्याची शिफारस केली होती. मात्र, बँकेच्या यंत्रणेने या अंतर्गत इशारांकडे दुर्लक्ष करून लाभार्थींना मंजुरी दिली आणि त्यानंतर उच्च-मूल्याचे व्यवहार सुरळीत पार पाडले गेले.

न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांनुसार, जर बँकेने लाभार्थी जोडतानाच तात्काळ हस्तक्षेप केला असता, तर हा मोठा आर्थिक घोटाळा पूर्णपणे टाळता आला असता किंवा त्याचे नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी करता आले असते. हा निकाल हा अत्यंत महत्त्वाचा संदेश देतो की, केवळ 'ओटीपी' पाठवून बँका आता आपली सर्व जबाबदारी झटकू शकत नाहीत. संशयित हालचाली किंवा विसंगती आढळल्यास ग्राहकांशी तातडीने संपर्क साधणे आणि कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे प्रत्येक वित्तीय संस्थेसाठी बंधनकारक आहे. हा निकाल भविष्यातील अशा अनेक प्रकरणांसाठी एक मजबूत पायंडा पाडणारा ठरणार आहे.

### अलीकडील काही महत्त्वाची प्रकरणे व कायदेशीर घडामोडी

डिजिटल बँकिंगच्या वाढत्या वापरासोबतच सायबर फसवणुकीच्या घटनांमध्येही प्रचंड वाढ झाली आहे. अशा प्रकरणांमध्ये ग्राहकांची फसवणूक झाल्यानंतर "व्यवहार ग्राहकाच्या संमतीने किंवा ओटीपीद्वारे झाला आहे" असे कारण पुढे करून बहुतांश बँका आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात. मात्र, नुकत्याच आलेल्या काही महत्त्वपूर्ण न्यायालयीन निकालांनी बँकांच्या या भूमिकेला मोठा आळा घातला आहे.

**या संदर्भातील काही प्रमुख अलीकडील प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत:**

**१. सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय**

**प्रकरण:** एका ग्राहकाच्या खात्यातून मोबाईल ॲप डाऊनलोड करायला लावून फ्रॉडस्टर्सनी ९४,२ रुपयांची फसवणूक केली. एसबीआय ने ही फसवणूक ग्राहकाने स्वतः ओटीपी किंवा एम-पिन शेअर केल्यामुळे झाली असे म्हणत नुकसान भरपाई देण्यास साफ नकार दिला.

**न्यायालयाचा निकाल:** सर्वोच्च न्यायालयाने बँकेचा युक्तिवाद फेटाळून लावत स्पष्ट केले की, ग्राहकांना फसवणुकीपासून सुरक्षित ठेवण्याची मुख्य जबाबदारी बँकांचीच आहे. बँकांनी फसवणूक रोखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. जर ग्राहकाने २४ तासांच्या आत बँकेला माहिती दिली असेल, तर आरबीआयच्या 'झिरो लायबिलिटी' नियमानुसार बँक संपूर्ण रक्कम परत करण्यास बांधील आहे.

**२. बँक ऑफ बडोदा प्रकरण**
**(मुंबई उच्च न्यायालय – मे २०२६)**

प्रकरण: 'सिम स्वॅप' द्वारे सायबर गुन्हेगारांनी एका ग्राहकाच्या खात्यातून १.२४ कोटी रुपयांची फसवणूक केली. बँकेने या व्यवहारांची जबाबदारी घेण्यास नकार दिला होता.

**न्यायालयाचा निकाल:** मुंबई उच्च न्यायालयाने बँक ऑफ बडोदाला मोठा दणका देत ग्राहकाला आरबीआयच्या 'झिरो लायबिलिटी' संरक्षणांतर्गत संपूर्ण पैसे परत करण्याचे निर्देश दिले. कोर्टाने स्पष्ट केले की, जर यंत्रणेतील तांत्रिक त्रुटीमुळे (उदा. सिम स्वॅप) फसवणूक झाली असेल आणि ग्राहकाचा थेट निष्काळजीपणा सिद्ध होत नसेल, तर बँकांना पळवाट शोधता येणार नाही.

**३. नागपूर ग्राहक मंचाचा निकाल**
**(जुलै २०२६ – 'डिजिटल अरेस्ट' घोटाळा)**

प्रकरण: नागपूरमधील एका सायबर फसवणुकीच्या ('डिजिटल अरेस्ट') प्रकरणात, फसवणूक झालेली रक्कम एका संशयित 'मनी म्युल' बँक खात्यात जमा झाली होती. ग्राहकाने तात्काळ तक्रार करूनही आयसीआयसीआय बँकेने ते खाते गोठवण्यास टाळाटाळ केली आणि आपली कोणतीही चूक नाही असे घोषित केले.

**आयोग निर्णय:** जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने बँकेला सेवेतील हलगर्जीपणाबद्दल दोषी धरले आणि मूळ रकमेसह भरपाई देण्याचे आदेश दिले. ग्राहकाने तातडीने माहिती दिल्यानंतरही संशयित खात्यामधील व्यवहार रोखण्यात अपयशी ठरलेल्या बँकांना आता ग्राहक मंचातही मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. ■■■

# समलिंगी जोडप्यांना 'पती-पत्नी' म्हणून करसवलत मिळावी

## केंद्रीय प्राप्तिकर कायद्याच्या कलम ५६(२)(x) अंतर्गत मिळणाऱ्या करसवलतीसाठी मुंबई उच्च न्यायालयात लढा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

समलिंगी जोडप्यांना प्राप्तिकर कायद्याच्या कलम ५६(२)(X) अंतर्गत मिळणाऱ्या करसवलतीपासून वंचित ठेवण्याच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात एक महत्त्वपूर्ण याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेद्वारे कायद्यातील तरतुदींना आव्हान देण्यात आले असून, दीर्घकाळ स्थिर नात्यात असलेल्या समलिंगी जोडप्यांनाही 'पती-पत्नी' या संज्ञेच्या कक्षेत आणत करमुक्त गिफ्ट्स किंवा मालमत्ता हस्तांतरणाचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी आणि कायदेशीर तरतूद :** प्राप्तिकर कायद्याच्या (INCOME TAX ACT, १९६१) कलम ५६(२)(X) नुसार, जर कोणतीही व्यक्ती मोबदल्याशिवाय किंवा अपुऱ्या मोबदल्यात ५०,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीची रोकड किंवा मालमत्ता प्राप्त करते, तर ती रक्कम 'इतर स्रोतांतून मिळणारे उत्पन्न' मानून त्यावर कर आकारला जातो. मात्र, या कलमाच्या पाचव्या पोटकलमातील स्पष्टीकरणानुसार, जर असे गिफ्ट्स किंवा मालमत्ता 'नातेवाईकांकडून' मिळाली, तर त्याला करसवलत दिली जाते. या



नातेवाईकांच्या व्याख्येत 'पती-पत्नी' यांचाही समावेश होतो.

परंतु, भारतातील विवाह कायद्यांनुसार समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता नसल्यामुळे, प्राप्तिकर कायद्याच्या या तरतुदीनुसार समलिंगी जोडीदारांना 'पती-पत्नी' मानले जात नाही. परिणामी, त्यांना या करसवलतीचा लाभ मिळत नाही.

**याचिकेतील मुख्य मुद्दे :** भेदभावपूर्ण तरतूद: ही तरतूद अप्रत्यक्षपणे समलिंगी जोडप्यांशी भेदभाव करणारी असून ती संविधानाच्या कलम १४, १५ आणि २१ मधील मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करते, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी (पायिओ आशिहो आणि त्यांचे भागीदार विवेक दिवान) केला आहे.

समानतेची मागणी: दीर्घकाळ आणि स्थिर नात्यात राहणाऱ्या समलिंगी जोडप्यांनाही विषमलिंगी विवाहित जोडप्यांप्रमाणेच समान कायदेशीर आणि आर्थिक अधिकार मिळायला हवेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

**प्राप्तिकर विभाग आणि केंद्राचा विरोध:**

या याचिकेला कडाडून विरोध करताना केंद्र सरकार व प्राप्तिकर विभागाने मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. विभागाच्या मते, जोपर्यंत भारतातील कोणत्याही विवाह कायद्यांतर्गत समलिंगी विवाहांना किंवा संबंधांना कायदेशीर मान्यता मिळत नाही, तोपर्यंत प्राप्तिकर कायद्याच्या कक्षेत जाऊन 'पती-पत्नी' या शब्दाचा अर्थ बदलता येणार नाही. याचिकाकर्ते कोणत्याही कायदेशीर मान्यतेशिवाय थेट प्राप्तिकर कायद्यातूनच या सवलती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत, जे कायद्याच्या प्रक्रियेचा दुरुपयोग असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती बी. पी. कोलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू असून, न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून आहे.

# छळ सोसणाऱ्या मुलींना 'तडजोड करा' म्हणू नका!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

विवाहित महिलांच्या हुंडाबळी अथवा कौटुंबिक छळाच्या तक्रारींकडे कुटुंबीयांनी दुर्लक्ष करू नये, असे अत्यंत महत्त्वपूर्ण निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिले आहेत. अशा पीडित महिलांना 'परिस्थितीशी जुळवून घ्या' अथवा 'तडजोड करून संसार टिकवा' असा सल्ला देणे नकळतपणे गुन्हेगारांचे मनोधैर्य वाढवणारे ठरते, अशी स्पष्टोक्ती न्यायालयाने केली आहे.

न्यायमूर्ती राजेश सिंह चौहान आणि न्यायमूर्ती अवधेश कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने २७ जुलै रोजी एका विवाहित महिला आणि तिच्या १५ महिन्यांच्या बालिकेच्या हुंडा मृत्यू प्रकरणाची सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. सासरच्या मंडळींकडून सतत हुंड्याची मागणी होत असून आपला छळ केला जात असल्याची माहिती मृत महिलेने अनेकदा आपल्या माहेरच्या मंडळींना दिली होती, हे न्यायालयाने प्रकर्षाने निदर्शनास आणून दिले. वारंवार प्राप्त होणाऱ्या अशा तक्रारींकडे किरकोळ कौटुंबिक मतभेद म्हणून दुर्लक्ष करणे अयोग्य आहे; उलटपक्षी, ती एक प्रकारे संरक्षणासाठी आणि वेळेवर हस्तक्षेप करण्यासाठी केलेली आर्त हाक मानली पाहिजे, असे खंडपीठाने नमूद केले.

# बिल्डर मृत पावल्यास फ्लॅटचे ताबे देण्याची जबाबदारी वारसांची

## राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा निकाल, पुणे येथील 'शेळके सदन' प्रकरणात ग्राहकांना सहा आठवड्यात ताबा देण्याचे आदेश

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

घर खरेदीदारांना फ्लॅटचा ताबा देण्याच्या आणि त्यांची कायदेशीर देणी पूर्ण करण्याच्या जबाबदारीपासून मृत विकासकाच्या कायदेशीर वारसांना कसल्याही प्रकारचा पळ काढता येणार नाही, असा अतिशय महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने (NCDRC) दिला आहे. पुण्याच्या सदाशिव पेठेतील 'शेळके सदन' या गृहप्रकल्पातील दोन घर खरेदीदारांना आगामी सहा आठवड्यांच्या आत फ्लॅटचा ताबा देण्याचे स्पष्ट निर्देश आयोगाने मृत विकासकाच्या वारसांना सुनावले आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, मूळ विकासक संजीव उद्धवराव शेळके हे प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना एप्रिल २०१५ मध्ये निधन पावले होते. त्यानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांनी या प्रकल्पाचे संपूर्ण नियंत्रण आपल्या हातात घेतले होते. या प्रकल्पातील दोन ग्राहकांना अनुक्रमे जून २०१५ आणि एप्रिल २०१६ पर्यंत फ्लॅटचा ताबा मिळणे बंधनकारक होते. त्यासाठी या खरेदीदारांनी अनुक्रमे ८० लाख आणि ८७ लाखांच्या ठरलेल्या एकूण रकमेपैकी तब्बल ७९.५२ लाख आणि ६६.६५ लाख रुपयांइतकी मोठी रक्कम आधीच संबंधित विकासकाला अदा केली होती.

परंतु, विकासकाच्या मृत्यूनंतर वारसांनी असा दावा केला होता की, खरेदीदारांनी भरलेल्या या रकमेबाबत




आम्हाला कोणतीही पूर्वकल्पना किंवा माहिती नव्हती. तसेच, विक्रीचे करार रद्द करण्यासाठी आणि इतर संबंधित मागण्यांसाठी दिवाणी न्यायालयात दावे प्रलंबित आहेत, असा बचावात्मक युक्तिवाद वारसांतर्फे पुढे करण्यात आला. मात्र, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. मूळ विकासकाच्या निधनानंतर त्यांच्या कायदेशीर वारसांनीच या प्रकल्पाचे नियंत्रण स्वेच्छेने हाती घेतले होते, पुढे बांधकाम सुरू ठेवले होते आणि इतकेच नव्हे तर एका नवीन तक्रारदारासोबत विक्रीचा कायदेशीर करारही केला होता. त्यामुळे, ज्यांनी आधीच प्रकल्पांतर्गत अधिकार मान्य केले आहेत, ते वारसदार एकाच वेळी स्वतःवरील कायदेशीर दायित्वांना आणि जबाबदाऱ्याना नाकारू शकत नाहीत, असे न्यायपीठाने आपल्या आदेशात अगदी स्पष्टपणे नमूद केले.

न्यायमूर्ती सुदीप अहलूवालिया आणि प्रिसिडिंग मेंबर साधना शेंगर यांच्या सामाईक न्यायपीठाने या प्रकरणात स्पष्ट केले की, जर कोणत्याही कारणास्तव निर्धारित मुदतीत फ्लॅटचा ताबा देणे अशक्य किंवा तांत्रिकदृष्ट्या शक्य नसेल, तर पर्यायी व्यवस्था म्हणून वारसांनी ग्राहकांची जमा केलेली संपूर्ण मूळ रक्कम त्यावर ९ टक्के इतक्या सरळ साध्या व्याजासह (रक्कम भरल्याच्या मूळ तारखेपासून ते प्रत्यक्ष वसुलीच्या दिनांकापर्यंत) विनाविलंब परत करावी लागेल. तसेच, या कायदेशीर लढाईत नाहक त्रास सहन करावा लागलेल्या तक्रारदारांना खटला खर्चापोटी प्रत्येकी ५० हजार रुपयांची अतिरिक्त रक्कम अदा करण्याचे सक्तीचे आदेशही आयोगाने दिले आहेत.

या संपूर्ण सुनावणीदरम्यान वारसांतर्फे असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, हे सर्व संबंधित खटले आता कालमर्यादेबाह्य (कालबाह्य) झाले आहेत आणि ते टिकण्यासारखे नाहीत. परंतु, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने हा मुद्दा देखील फेटाळून लावला. कायदेशीर ताबा हस्तांतरित करण्यामध्ये झालेली कसूर ही केवळ एका दिवसाची नसून ती दररोज घडणारी आणि सातत्याने सुरू राहणारी एक कायदेशीर प्रक्रिया म्हणजेच 'कंटीन्यूइंग कॉज ऑफ एक्शन' आहे, असे आयोगाने स्पष्ट केले. प्रकल्पाच्या मूळ कराराची मुदत संपली किंवा विकासकाचे निधन झाले म्हणून विकासकाच्या प्रकल्प पूर्ण करण्याच्या आणि ग्राहकांना हक्काचा ताबा देण्याच्या मूलभूत आणि कायदेशीर दायित्वाला पूर्णपणे मुक्ती मिळत नाही. शिवाय, दिवाणी न्यायालयांमध्ये अन्य दावे प्रलंबित आहेत या एकमेव कारणावरून घर खरेदीदारांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत योग्य ती दाद मागण्यापासून रोखता येणार नाही, कारण ग्राहक मंचासमोरील कायदेशीर बाबी आणि दिवाणी दावे हे पूर्णपणे भिन्न आहेत, असे सांगत आयोगाने हा निकाल दिला. दरम्यान, तक्रारदारांचे कायदेशीर प्रतिनिधित्व करणारे वकील मिलिंद महाजन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हा न्यायालयाचा आदेश आगामी सहा आठवड्यांच्या आत तंतोतंत लागू करायचा आहे, आणि अद्याप आमच्या अशिलांना फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला नाही, त्यामुळे बिल्डरच्या पुढील कायदेशीर पर्यायांवर लक्ष ठेवून आम्ही सुप्रीम कोर्टात योग्य ती कायदेशीर कारवाई किंवा कॅव्हेट दाखल करण्याच्या अनुषंगाने विचार करत आहोत.

# 'प्रायव्हसी बार' म्हणजे काय?

## भारताचे डिजिटल भविष्य !! कायद्याच्या क्षेत्रात एका नवीन शाखेचा उदय

*आजच्या डिजिटल युगात आपण प्रत्येक लहान-मोठ्या कामासाठी मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करत आहोत. ऑनलाईन शॉपिंग असो, बँकिंग असो किंवा रेल्वे-विमान तिकीट बुकिंग असो, आपण आपली वैयक्तिक माहिती (नाव, पत्ता, फोन नंबर, बँक तपशील) सतत कुठे ना कुठे शेअर करत असतो. पण, ही माहिती सुरक्षित ठेवणे आणि प्रत्येकाची प्रायव्हेसी जपणे किती महत्त्वाचे आहे, याचा कधी आपण विचार केला आहे का? युरोपियन युनियनचा 'जीडीपीआर' (GDPR), अमेरिकेचा 'कॅलिफोर्निया कंझ्युमर प्रायव्हेसी कायदा' (CCPA) आणि आता आपल्या देशात आलेला 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' (DPDP Act) यांमुळे जगभरात डेटा सुरक्षेचे आणि प्रायव्हेसीचे नियम अत्यंत कडक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर, कायद्याच्या क्षेत्रात एका अगदी नवीन आणि अत्यंत महत्त्वाच्या शाखेचा उदय होत आहे, जिचे नाव आहे 'प्रायव्हसी बार'.*

**'प्रायव्हसी बार' म्हणजे नेमके काय?**

'प्राइवेसी बार' म्हणजे वकिल, न्यायाधीश, कायदेतज्ज्ञ आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांचा असा एक विशेष समुदाय, जो केवळ डेटा संरक्षण, माहितीची गोपनीयता, सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कायद्यांवर लक्ष केंद्रित करतो. पूर्वी तंत्रज्ञान किंवा कॉर्पोरेट कायद्याचा एक छोटासा भाग समजली जाणारी प्रायव्हेसी, आज एक स्वतंत्र आणि अत्यंत शक्तिशाली क्षेत्र बनली आहे. भारतासारख्या वेगाने डिजिटल होत असलेल्या देशात, आगामी काळात कंपन्यांना आणि सर्वसामान्यांना नागरिकांची प्रायव्हेसी सुरक्षित राखण्यासाठी या विशेष वकिलांची प्रचंड गरज भासणार आहे.

**परदेशात 'प्राइवेसी बार'ची सुरुवात का झाली आणि त्याची पार्श्वभूमी?**

भारतात 'प्राइवेसी बार'चा उदय नुकताच होत असला, तरी पाश्चात्त्य देशांमध्ये या विशेष कायदेशीर समुदायाची स्थापना बरीच आधी झाली आहे. परदेशात (विशेषतः अमेरिका आणि युरोपमध्ये) या क्षेत्राची गरज निर्माण होण्यामागे काही प्रमुख जागतिक कारणे आणि ऐतिहासिक उदाहरणे आहेत.

**१. कडक कायदे आणि कोट्यवधींचा दंड**

परदेशात डेटा संरक्षणाचे नियम अत्यंत कडक आहेत. जर एखाद्या कंपनीने युजर्सच्या माहितीचा गैरवापर केला, तर त्यांना टाळता न येणारा प्रचंड आर्थिक भुर्दंड बसतो.

**युरोपियन युनियनचा जीडीपीआर :** २०१८ मध्ये लागू झालेला 'जनरल डेटा प्रोटेक्शन रेग्युलेशन' हा जगातील सर्वात कडक डेटा प्रायव्हेसी कायदा मानला जातो. या कायद्यानुसार, जर कोणत्याही कंपनीने डेटा सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केले, तो त्यांच्या जागतिक वार्षिक उलाढालीच्या (Global Turnover) ४% पर्यंत किंवा २ कोटी युरो (यापैकी जी रक्कम जास्त असेल) दंड आकारला जाऊ शकतो.

**उदाहरणः** गुगलआणि मेटा (फेसबूक) सारख्या महाकाय कंपन्यांवर युरोपियन युनियनने प्रायव्हेसीच्या उल्लंघनासाठी अब्ज डॉलर्सचे दंड ठोठावले आहेत. अशा कायदेशीर जोखमींपासून कंपन्यांना वाचवण्यासाठी परदेशात स्वतंत्र 'प्राइवेसी बार'च्या वकिलांची फौज तयार झाली.

> "भविष्यातील डिजिटल भारत कसा असेल, हे यावर अवलंबून असेल कि आपण तंत्रज्ञानाच्या प्रगतीत आणि प्रत्येक व्यक्तीच्या प्रायव्हसी व स्वातंत्र्यात किती चांगला समतोल राखतो; आणि हा समतोल साधण्याचे शिवधनुष्य येत्या काळात 'प्रायव्हसी बार'ला पेलावे लागेल."



**२. टेक कंपन्यांची मक्तेदारी आणि डेटा चोरीचे महाघोटाळे**

अमेरिकेत आणि युरोपमध्ये तंत्रज्ञान कंपन्यांनी कोट्यवधी लोकांचा डेटा बेकायदेशीरपणे गोळा करून तो राजकारणासाठी किंवा जाहिरातींसाठी विकल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली. यामुळे नागरिकांच्या प्रायव्हसीचा प्रश्न ऐरणीवर आला.

**केंब्रिज ॲनालिटिका प्रकरण :** २०१० च्या दशकाच्या उत्तरार्धात उघड झालेले हे प्रकरण जगप्रसिद्ध आहे. यादरम्यान फेसबुकवरील जवळपास ८ कोटी ७ लाख युजर्सचा वैयक्तिक डेटा त्यांची परवानगी न घेता राजकीय प्रचारासाठी वापरण्यात आला. या एकाच घटनने अमेरिकेत आणि ब्रिटनमध्ये खळबळ उडवून दिली.

अशा मोठ्या घोटाळ्यांनंतर टेक कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी, तसेच पीडित नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी अमेरिकेत विशेष प्रायव्हेसी वकिलांची (Privacy Litigators) नितांत गरज भासू लागली, ज्यातून 'प्राइवेसी बार' अधिक मजबूत झाला.

**३ . कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि अल्गोरिदमचे नवे धोके**

आधुनिक काळात चॅटजीपीटी, डीपफेक आणि एआय तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे लोकांच्या वैयक्तिक आयुष्यावर थेट अतिक्रमण होत आहे. कोणाचेही फोटो किंवा माहिती वापरून एआय मॉडेल्सला प्रशिक्षित (Train) केले जात आहे. परदेशात यावर आळा घालण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल ट्रेड कमिशन (FTC) ने एआय कंपन्यांवर कडक नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. अल्गोरिदममुळे होणारा पक्षपात (Algorithmic Bias) आणि गोपनीयतेचा भंग रोखण्यासाठी परदेशी न्यायालयात आता विशेष 'प्राइवेसी लॉयर्स' युक्तिवाद करत आहेत.

"परदेशात तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे जेव्हा नागरिकांची प्रायव्हसी धोक्यात आली, तेव्हा पारंपारिक वकिली अपुरी पडली; आणि याच गरजेतून जगभरात 'प्राइवेसी बार' नावाच्या एका नव्या आणि शक्तिशाली कायदेशीर संस्कृतीचा जन्म झाला."

**भारताच्या भविष्यात 'प्रायव्हसी बार'ची गरज का निर्माण होत आहे?**

भारतात

> "ज्या वेगाने तंत्रज्ञान आपल्या वैयक्तिक आयुष्यात आणि प्रायव्हसीमध्ये प्रवेश करत आहे, त्यावरून हे स्पष्ट होते कि येत्या काळात प्राइवेसी बारमधील वकील हे केवळ कायदेशीर सल्लाहकार नसून आपल्या डिजिटल लोकशाहीचे आणि प्रायव्हेसीचे रक्षक असणार आहेत."

DPDP कायदा लागू झाल्यानंतर, कंपन्यांची जबाबदारी अनेक पटींनी वाढली आहे. आता कंपन्यांना ग्राहकांची प्रायव्हेसी जपण्यासाठी 'डेटा फिड्यूशरी' म्हणून कडक नियमांचे पालन करावे लागते. या कायद्याचे उल्लंघन केल्यास कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचा दंड होऊ शकतो. यामुळेच भविष्यात खालील क्षेत्रात वकिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे:

कायदेशीर अनुपालनः कंपन्यांना त्यांच्या वेबसाईट किंवा ॲपवर ग्राहकांची माहिती

> "डेटाची प्रायव्हसी आता कोणत्याही कंपनीसाठी केवळ एक दिखावा किंवा पर्यायी बाब राहिलेली नाही, तर तो एका पारदर्शक, विश्वासू आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या संस्थेचा पाया बनला आहे."

गोळा करताना प्रायव्हेसीच्या अटींनुसार 'नोटीस आणि परवानगी' मिळवण्याची योग्य यंत्रणा उभी करावी लागेल. यासाठी प्राइवेसी वकिलांचे मार्गदर्शन अनिवार्य असेल.

**डेटा लीक किंवा हॅकिंगची समस्या :** जर कधी सायबर हल्ल्यामुळे ग्राहकांची प्रायव्हेसी धोक्यात आली आणि डेटा लीक झाला, तर 'डेटा प्रोटेक्शन बोर्ड' (DPB) आणि प्रभावित ग्राहकांना तातडीने कायदेशीर माहिती देणे आवश्यक असते. अशा संकटाच्या प्रसंगी कंपन्यांना त्वरित कायदेशीर सल्ला देणाऱ्या तज्ज्ञांची गरज असते.

**कंपन्यांचे विलीनकरण :** जेव्हा दोन मोठ्या कंपन्या एकत्र येतात, तेव्हा त्या एकमेकांच्या डेटा संपत्तीची देवाणघेवाण करतात. यामध्ये ग्राहकांच्या प्रायव्हेसीचा भंग होणार नाही, याची खात्री करण्यासाठी प्राइवेसी ऑडिट केले जाते.

**गोपनीयता संदर्भातील खटले :** जर कंपन्यांनी ग्राहकांच्या प्रायव्हेसीचा गैरवापर केला, तर त्यांच्यावर होणाऱ्या खटल्यांमध्ये किंवा सरकारी तपासात बचाव करण्यासाठी प्राइवेसी लिटिगेटर्सची गरज भासेल.

**सामान्य नागरिकांच्या दृष्टीने याचे महत्त्व**

आजचा सामान्य भारतीय नागरिक आपल्या डिजिटल अधिकारांबाबत आणि प्रायव्हेसीबाबत हळूहळू जागरूक होत आहे. आपल्याला आपल्या डेटाबद्दल माहिती मागण्याचा, चुकीचा डेटा सुधारण्याचा किंवा तो पूर्णपणे डिलीट करण्याचा अधिकार मिळाला आहे. जेव्हा एखादी कंपनी ग्राहकांच्या प्रायव्हेसीचे उल्लंघन करते, तेव्हा सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्राइवेसी बारचे वकील महत्त्वाची भूमिका बजावतील.

**भविष्यातील आव्हाने आणि संधी**

आगामी काळात भारताला नागरिकांची प्रायव्हेसी सुरक्षित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सायबर तज्ज्ञ आणि प्राइवेसी वकिलांची आवश्यकता असणार आहे. बँकिंग, ई-कॉमर्स, आरोग्य सेवा, शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या सर्वच क्षेत्रांमध्ये डेटा प्रायव्हेसीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे नवीन कायद्यांचे शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी हे भविष्यातील सर्वात मोठे आणि वेगाने वाढणारे करिअर क्षेत्र बनणार आहे.

थोडक्यात सांगायचे तर, येणारा काळ हा डेटा आणि प्रायव्हेसीचा काळ आहे आणि जिथे डिजिटल डेटा आहे, तिथे सुरक्षेसाठी 'प्राइवेसी बार'ची नितांत आवश्यकता आहे. भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेला सुरक्षित, खाजगी आणि पारदर्शक बनवण्यासाठी हा वर्ग उद्याचा मुख्य आधारस्तंभ ठरणार यात शंका नाही.

**पुणे बार अँड बेंच टीम**

### 'डिजिटल साक्षीदार पडताळणी केंद्र'

सत्र न्यायालयात साक्षीदारांची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी एक स्वतंत्र 'डिजिटल साक्षीदार पडताळणी केंद्र' असावे, जिथे कागदपत्रे व बायोमेट्रिकद्वारे त्यांची तात्काळ नोंदणी केली जाईल, ज्यामुळे खोट्या साक्षीदारांचा धोका टळून न्यायिक प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता येईल आणि साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया अतिशय सुरक्षित व जलद पार पडेल.

**ॲड. प्रकाश मोरे**, सत्र न्यायालय, पुणे

### 'कामगार कायदेशीर साक्षरता डिजिटल किओस्क'

श्रम न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर कामगारांच्या हक्कांची माहिती देणारा एक 'मराठी भाषिक डिजिटल टच-स्क्रीन किओस्क' बसवावा, ज्याच्या माध्यमातून अल्पशिक्षित कामगार स्वतःचे मालकी हक्क, किमान वेतन आणि तक्रारीच्या पद्धतीबद्दल सोप्या पद्धतीने माहिती मिळवू शकतील, ज्यामुळे दलालांची लुबाडणूक थांबून कामगारांमध्ये कायदेशीर जागरूकता निर्माण होईल आणि त्यांना न्याय मिळवण्याचा मार्ग सुकर होईल.

**ॲड. विकास मोहिते**, कामगार न्यायालय, पुणे

### 'ऑनलाइन तक्रार स्थिती ट्रॅकिंग स्क्रीन'

ग्राहक न्यायालयाच्या आवारात प्रत्येक मजल्यावर एक मोठी 'स्मार्ट डिजिटल स्क्रीन' बसवावी, ज्यावर दाखल केलेल्या अर्जाची सद्यस्थिती, सुनावणीची तारीख आणि निकालाचा टप्पा घरबसल्या किंवा तिथेच पाहता येईल, ज्यामुळे सामान्य ग्राहकांना केवळ एका माहितीसाठी कर्मचाऱ्यांमागे चकरा माराव्या लागणार नाही आणि प्रशासकीय कामकाजात डिजिटल कार्यक्षमता वाढून नागरिकांचा अमूल्य वेळ व श्रम वाचतील.

**ॲड. नेहा कुलकर्णी**, ग्राहक न्यायालय, पुणे




### 'डिजिटल आर्बिट्रेशन आणि मिडिएशन हॉल'

सहकारी संस्थांचे वाद बाहेरच्या बाहेर मिटवण्यासाठी न्यायालयाच्या इमारतीत एक अत्याधुनिक 'डिजिटल आर्बिट्रेशन आणि मिडिएशन हॉल' असावा, जिथे ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धतीने वाटाघाटी करून वाद मिटवता येतील, ज्यामुळे न्यायालयांवर असलेला हजारो खटल्यांचा ताण कमी होऊन लवकरात लवकर तडजोडीचे निर्णय लागतील आणि संस्थांमधील अंतर्गत कटूता संपून सहकार चळवळीला बळकटी मिळेल.

**ॲड. सुहास जाधव**, को-ऑपरेटिव्ह कोर्ट, पुणे

### 'तडजोड लोकअदालत डिजिटल मेसेजिंग सिस्टीम'

मोटार अपघात न्यायाधिकरणातील भरपाईचे दावे लोकअदालतच्या माध्यमातून जलदगतीने तडजोडीने मिटवण्यासाठी पक्षकारांच्या मोबाईलवर स्वयंचलित 'डिजिटल मेसेजिंग सिस्टीम' सुरू करावी, जिथे त्यांना लोकअदालतच्या तारखा आणि फायद्यांची माहिती आगाऊ मिळेल, ज्यामुळे प्रलंबित केसेसचा डोंगर कमी होऊन अपघातग्रस्त पीडितांना त्यांची हक्काची आर्थिक भरपाई अत्यंत कमी वेळेत व विनासायास मिळू शकेल.

**ॲड. सुमित राऊत**, MACT कोर्ट, पुणे

### 'वरिष्ठ नागरिक आणि पक्षकारांसाठी मोफत ई-रिक्षा सेवा'

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयाच्या विस्तीर्ण परिसरात एका गेटवरून दुसऱ्या इमारतीत जाण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी 'मोफत ई-रिक्षा सेवा' सुरू करावी, जिथे सतत फिरणाऱ्या या ई-रिक्षांमुळे वृद्धांना व दिव्यांगांना कोणत्याही त्रासाविना थेट कोर्ट रूमपर्यंत पोहोचता येईल, ज्यामुळे न्यायव्यवस्थेची जनमानसात एक अत्यंत संवेदनशील, मानवीय आणि सर्वसमावेशक प्रतिमा निर्माण होईल.

**सामाजिक कार्यकर्ता समीर फडणीस**, पुणे

### 'महिला वकिलांसाठी पाळणाघर सुविधा'

न्यायालयीन कामकाजामध्ये दिवसभर व्यस्त असणाऱ्या महिला वकील आणि महिला कर्मचाऱ्यांच्या लहान मुलांच्या संगोपनासाठी परिसराजवळ एक सुरक्षित 'आधुनिक पाळणाघर' सुरू करावे, जिथे प्रशिक्षित सेविकांच्या देखरेखीखाली बालकांची योग्य काळजी घेतली जाईल, ज्यामुळे महिलांना आपल्या व्यावसायिक आणि कायदेशीर जबाबदाऱ्या कोणत्याही कौटुंबिक चिंतेशिवाय व पूर्ण एकाग्रतेने पार पाडता येतील.

**ॲड. प्रियांका शितोळे**, कोथरूड, पुणे

### 'मुलांच्या तात्पुरत्या भेटीसाठी बाल क्रीडांगण कक्ष'

कौटुंबिक न्यायालयात वादग्रस्त घटस्फोट प्रकरणांमध्ये माता-पिता आपल्या मुलांची भेट घेण्यासाठी येतात, त्यांच्यासाठी एक खेळण्यांनी सुसज्ज असा 'बाल क्रीडांगण कक्ष' असावा, जिथे तज्ज्ञ समुपदेशकांच्या उपस्थितीत मुले आपल्या पालकांना भेटू शकतील, ज्यामुळे मुलांच्या कोवळ्या मनावर न्यायालयीन वादाचा ताण येणार नाही आणि कौटुंबिक न्यायालयात एक संवेदनशील व आश्वासक वातावरण तयार होण्यास मदत होईल.

**ॲड. वैशाली कुलकर्णी**, फॅमिली कोर्ट, पुणे

### 'वकिलांच्या खाजगी बैठकांसाठी पॉडकास्ट व मिटिंग पॉड्स'

वकिलांना पक्षकारांशी किंवा सहकाऱ्यांशी अत्यंत गोपनीय कायदेशीर चर्चा करण्यासाठी बार रूमच्या शेजारी लहान व ध्वनिरोधक 'प्रायव्हसी पॉड्स' (केबिन) उपलब्ध करून द्याव्यात, ज्यामध्ये इंटरनेट व बसायची सोय असेल, ज्यामुळे गर्दीच्या ठिकाणी होणारी गुप्त माहिती लीक होण्याची समस्या सुटेल आणि वकिलांना व्यावसायिक गोपनीयता पाळून क्लायंटसोबत मोकळेपणाने चर्चा करणे शक्य होईल.

**ॲड. समीर देशमुख**, पुणे जिल्हा न्यायालय



वाचकांनी आपली पत्रे punebarandbench@gmail.com वर पाठवावीत किंवा, संपादक, पुणे बार अँड बेंच, ऑफिस नं. ७, पहिला मजला, चुनावाला चेंबर्स, शिक्षण मंडळाशेजारी, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ या पत्त्यावर पाठवावीत.



# एलएलबी पदवीधारकांसाठी सरकारी सेवेची सुवर्णसंधी !

## न्यायव्यवस्था, बँकिंग, आणि संरक्षण क्षेत्रात सरकारी अधिकारी बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या युवकांसाठी करिअरच्या अनेक आकर्षक वाटा

आजच्या अतिस्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळवणे म्हणजे करिअरची हमी नव्हे, तर त्या पदवीचा आणि ज्ञानाचा सुयोग्य वापर करून योग्य क्षेत्रात आपले स्थान निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. विशेषतः विधी (Law) शाखेची पदवी धारण करणाऱ्या म्हणजेच 'एलएलबी' पूर्ण केलेल्या कायदेशीर अभ्यासकांसाठी आज सरकारी आणि प्रशासकीय क्षेत्रात सुवर्णसंधींची कमतरता नाही. पारंपारिक वकिली व्यवसायाव्यतिरिक्त अनेक प्रतिष्ठित सरकारी परीक्षा आणि उच्च पदस्थ जागा विधी पदवीधरांची वाट पाहत आहेत. योग्य नियोजन, अचूक धोरण आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर तरुण वर्ग या क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करू शकतो.

### १. बँकिंग आणि वित्त क्षेत्र: बँक मॅनेजर आणि ऑफिसर (IBPS PO, RRB, LIC AAO)

आजकाल बँकिंग आणि विमा क्षेत्रात केवळ वाणिज्य शाखेचे विद्यार्थीच जातील असे अजिबात नाही, तर विधी पदवीधर देखील या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रुजू होत आहेत आणि नेत्रदीपक प्रगती करत आहेत.

- **भूमिका आणि जबाबदारी:** बँकिंग आणि वित्तीय संस्थांमध्ये दैनंदिन प्रशासकीय कार्य सुरळीत चालवणे, कायदेशीर अनुपालन काटेकोरपणे पाळणे आणि ग्राहकांशी व जनतेशी सार्वजनिक संबंध (Public Dealings) सांभाळण्यासाठी मॅनेजर किंवा ऑफिसर पदांवर नियुया केल्या जातात. बँकांना येणाऱ्या कायदेशीर अडचणी सोडवण्यात हे अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावतात.
- **पात्रता:** मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेची पदवी. (विशेषतः एलएलबी पदवीधारकांना कायदेशीर बाबी आणि दस्तऐवजीकरणामध्ये विशेष प्राधान्य मिळते.)

**परीक्षा स्वरूप:** यात प्रामुख्याने तर्कशक्ती , परिमाणात्मक पात्रता , इंग्रजी भाषा आणि चालू घडामोडींवर आधारित वस्तुनिष्ठ चाचण्या घेतल्या जातात. काही परीक्षांच्या मुख्य परीक्षेत विधी पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्णनात्मक चाचणीचाही समावेश असतो.

### २. बँक लिपिक (IBPS Clerk)

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये लिपिक पदासाठी ही अत्यंत स्पर्धात्मक आणि लोकप्रिय परीक्षा मानली जाते. या माध्यमातून बँकेत प्रवेश केल्यानंतर अंतर्गत पदोन्नतीच्या (Internal Promotion) माध्यमातून अधिकारी पदापर्यंत पोहोचण्याच्या प्रचंड संधी उपलब्ध होतात.

- **पात्रता:** कोणत्याही मान्यताप्राप्त शाखेतील पदवी.
- **परीक्षा स्वरूप:** संख्यात्मक क्षमता, बुद्धिमत्ता चाचणी, इंग्रजी भाषा आणि सामान्य जाणिवांवर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा द्वारे निवड केली जाते.

### ३. भारतीय लष्कर: ज्युज ॲडव्होकेट जनरल (JAG - Judge Advocate General)

देशसेवेची तीव्र आवड असणाऱ्या आणि कायद्याचा गाढा अभ्यास असलेल्या तरुणांसाठी भारतीय लष्करात थेट अधिकारी बनण्याची ही एक अत्यंत मानाची आणि अभिमानास्पद संधी आहे.

- **भूमिका आणि जबाबदारी:** शॉर्ट सर्व्हिस कमीशनच्या माध्यमातून लष्करामध्ये कायदेशीर अधिकारी म्हणून सेवा बजावणे, लष्करी कायदे काटेकोरपणे राबवणे आणि लष्करी न्यायालयांमध्ये कायदेशीर सल्ला देण्याचे महत्त्वपूर्ण व अत्यंत जबाबदारीचे काम या पदावर करावे लागते.
- **पात्रता:** एलएलबी पदवी (किमान गुण आणि इतर निकषांसह).




**CAREER IN LAW**

- **निवड प्रक्रिया:** यामध्ये बहु-स्तरीय कठोर निवड प्रक्रिया असते. यात कागदपत्र छाननी, ग्रुप टास्क, मुलाखत आणि सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड म्हणजेच एसएसबी (SSB) मुलाखत व सखोल वैद्यकीय तपासणीचा समावेश असतो.

### ४. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया : आरबीआय ग्रेड 'बी' आणि लीगल ऑफिसर (RBI Grade B / Legal Officer)

भारताच्या मध्यवर्ती बँकेत म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये (RBI) उच्च पद व प्रतिष्ठा मिळवणे हे देशातील लक्षावधी तरुणांचे स्वप्न असते. आरबीआयमधील ही पदे अत्यंत मानाची, प्रतिष्ठेची आणि आकर्षक मानली जातात.

- **भूमिका आणि जबाबदारी:** देशाच्या सर्वोच्च आर्थिक धोरणांची निर्मिती करणे, वित्तीय संस्थांचे नियमन करणे आणि बँकेला कायदेशीर सल्ला देण्याची मोठी जबाबदारी या पदांवर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर असते.
- **पात्रता:** लीगल ऑफिसर पदासाठी एलएलबी पदवी बंधनकारक असून अनुभव मागितला जाऊ शकतो, तर इतर ग्रेड बी पदांसाठी कोणत्याही शाखेतील पदवी चालते.
- **परीक्षा स्वरूप:** पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत असा तीन टप्प्यांचा हा अतिशय स्पर्धात्मक प्रवास असतो. पूर्व परीक्षेत सर्वसाधारण बुद्धिमत्ता व सामान्य ज्ञान तपासले जाते, तर मुख्य परीक्षेत आर्थिक, सामाजिक, राजकीय ज्ञान आणि कायदेशीर कौशल्याची कठोर परीक्षा घेतली जाती.

**यशस्वी होण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स आणि धोरण:**


- **अभ्यासक्रमाची योग्य माहिती:** परीक्षेचे स्वरूप आणि सिलॅबस समजून घेणे हे यशाचे पहिले पाऊल आहे. कोणतीही परीक्षा देताना तिचे टप्पे आणि गुणांची विभागणी व्यवस्थित अभ्यासणे गरजेचे आहे.
- **वेळापत्रक आणि सातत्य:** दररोज नियमितपणे अभ्यासाचे नियोजन करून चालू घडामोडींवर विशेष पकड ठेवावी. वर्तमानपत्रे वाचणे आणि कायदेशीर घडामोडींचा आढावा घेणे फायदेशीर ठरते.
- **मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका:** जुन्या प्रश्नपत्रिका सोडवल्याने परीक्षेचा पॅटर्न लक्षात येतो आणि वेळेचे नियोजन सुधारण्यास मदत होते.
- **कायदेशीर मसुदा आणि उजळणी:** एलएलबीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाची सातत्याने उजळणी करावी आणि उत्तर लेखनाचा सराव वाढवावा.

थोडक्यात सांगायचे तर, एक एलएलबी पदवी केवळ न्यायालयात युक्तिवाद करण्यासाठीच नव्हे, तर देशाच्या प्रशासकीय आणि कायदेशीर चौकटीला बळकट करण्यासाठी अनेक मार्ग उघडी करते. न्यायव्यवस्था), सरकारी वकील , बँकिंग, संरक्षण दल किंवा उच्चस्तरीय कायदेशीर सल्लागार यांसारखे अनेक पर्याय आज तरुणांसमोर उपलब्ध आहेत.

आपल्या सुप्त गुणांना ओळखून, आवडीचे क्षेत्र निवडून आणि योग्य दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास सरकारी क्षेत्रात एक सुरक्षित, सन्मानाची आणि यशस्वी कारकीर्द घडवणे अजिबात कठीण नाही. आजच आपल्या ध्येयाची निश्चिती करा आणि उज्वल भविष्यासाठी आत्मविश्वासाने पाऊल उचला!

**महत्त्वपूर्ण कायदेशीर मॅक्सिम्स (LEGAL MAXIMS) – मराठी व इंग्रजी अर्थ**

| अ.क्र. | कायदेशीर मॅक्सिम | इंग्रजी अर्थ | मराठी अर्थ |
|---|---|---|---|
| १ | ACTIO PERSONALIS MORITUR CUM PERSONA | A PERSONAL RIGHT OF ACTION DIES WITH THE PERSON | कृतीचा वैयक्तिक अधिकार व्यक्तीसह मरतो |
| २ | ACTIONABLE PER SE | THE VERY ACT IS PUNISHABLE; NO PROOF OF DAMAGE IS REQUIRED | नुकसानाचा पुरावा आवश्यक नाही; कृत्य हेच दंडनीय आहे |
| ३ | ACTORI INCUMBIT ONUS PROBANDI | THE BURDEN OF PROOF LIES ON THE PLAINTIFF | पुराव्याचा भार फिर्यादीवर असतो |
| ४ | ACTUS NON FACIT REUM NISI MENS SIT REA | THE ACT DOES NOT MAKE ONE GUILTY UNLESS THERE IS A GUILTY INTENT | दोषी हेतू असल्याशिवाय कोणतेही कृत्य एखाद्याला दोषी ठरवत नाही |
| ५ | AD HOC | FOR THE SPECIAL END OR CASE AT HAND | विशेष हेतूसाठी किंवा हातातील विशिष्ट प्रकरणासाठी |
| ६ | ALIBI | AT ANOTHER PLACE | दुसऱ्या ठिकाणी (गुन्ह्याच्या वेळी अन्यत्र असण्याचा सिद्धांत) |
| ७ | AMICUS CURIAE | A COURT COMPANION OR PARTNER OF THE BAR ASSIGNED TO ASSIST THE COURT | न्यायालयाला मदत करण्यासाठी नियुक्त केलेला न्यायालयाचा मित्र/सहकारी |
| ८ | ANTE LITEM MOTAM | BEFORE A CLAIM IS BROUGHT | दावा किंवा खटला दाखल करण्यापूर्वी |
| ९ | ASSENTIO MENTIUM | THE MEETING OF MINDS | परस्पर संमती / मनांचे ऐक्य |



# मुंबई उच्च न्यायालाचे टॉप १० निकाल (३ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट)

**१. तरुण तेजपाल २०१३ लैंगिक अत्याचार प्रकरणात दोषी सिद्ध**

- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले आणि न्यायमूर्ती अमित जमसंदकर (गोवा खंडपीठ)
- **निर्णय:** एका महत्त्वाच्या निकालात, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने सत्र न्यायालयाचा २०२१ चा निर्दोष मुक्ततेचा निर्णय बाजूला सारत माजी पत्रकार तरुण तेजपाल यांना २०१३ मधील लैंगिक अत्याचार आणि बलात्काराच्या प्रकरणात दोषी ठरवले. खटल्यातील पुराव्यांचे चुकीचे मूल्यांकन केल्याप्रकरणी खंडपीठाने त्यांना १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

**२. नितीन गडकरींवरील एआय डीपफेक आणि आक्षेपार्ह पोस्ट तातडीने हटवण्याचे निर्देश**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर
- **निर्णय:** कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) गैरवापर करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याविरुद्ध पसरवल्या जाणाऱ्या अयोग्य, असंसदीय आणि बदनामीकारक डीपफेक व्हिडिओंच्या विरोधात उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. मेटा, एक्स आणि गुगल यांसारख्या प्रमुख तंत्रज्ञान कंपन्यांना अशा प्रकारची आक्षेपार्ह सामग्री त्वरित इंटरनेटवरून काढून टाकण्याचे अंतरिम निर्देश न्यायालयाने दिले.

**३. केंद्राची साखरेच्या निर्यातीवरील बंदी कायम**

- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती सुमन श्याम आणि न्यायमूर्ती अद्वैत एम. सेठना
- **निर्णय:** देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा आणि किमती नियंत्रणात राहाव्यात यासाठी केंद्र सरकारने ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत साखरेच्या निर्यातीवर घातलेली बंदी कायदेशीर असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. खासगी व्यावसायिक करार किंवा आगाऊ झालेली बुकिंग्स सरकारी धोरणात्मक अधिसूचनांच्या वरचढ ठरू शकत नाहीत, असे सांगत न्यायालयाने निर्यातदारांच्या याचिका फेटाळून लावल्या.



**४. भरपाई वनीकरण केवळ संख्यात्मक प्रतिस्थापन नव्हे**

- **तारीख:** ४ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती अमित बोरकर
- **निर्णय:** पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी कांदळवनांच्या  क्षेत्राच्या वळवण्याला परवानगी देताना, उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की केवळ कागदावर झाडे लावून वृक्षारोपण दाखवणे चालणार नाही. जैवविविधतेचे रक्षण आणि पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

**५. शिक्षण सेवकांना 'एमईपीएस' कायद्याचे कायदेशीर संरक्षण**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** एका शाळेतील शिक्षिकेच्या तोंडी (बडतर्फी) आदेशाला रद्द करताना उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, 'शिक्षण सेवक' पदावर कार्यरत कर्मचारी देखील महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली (MEPS Act) अंतर्गत संरक्षणास पात्र असतात. योग्य कायदेशीर प्रक्रियेशिवाय त्यांना मनमानी पद्धतीने नोकरीवरून काढता येत नाही.

**६. रेल्वे कर्मचाऱ्याची बनावट भ्रष्टाचाराची तक्रार आणि आत्महत्येचा प्रयत्न हा गंभीर गैरव्यवहार**

- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** एका रेल्वे कर्मचाऱ्याने बदल्याची मागणी अमान्य झाल्यावर ड्युटीवर असताना विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करणे आणि वरिष्ठांवर खोटे भ्रष्टाचाराचे आरोप करणे हा गंभीर स्वरूपाचा प्रशासकीय गैरव्यवहार ठरतो, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने विभागीय शिस्तभंगाची कारवाई आणि नोकरीवरून बडतर्फ करण्याचे आदेश कायम ठेवले.

**७. प्राप्तिकर  प्रकरणांमध्ये निर्णय देण्यासाठी ९० दिवसांची मर्यादा पाळण्याचे निर्देश**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** न्यायदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी, ज्या आयकर प्रकरणांमधील सुनावण्या पूर्ण होऊन निर्णय राखून ठेवले आहेत, अशा सर्व प्रकरणांमध्ये कमाल ९० दिवसांच्या आत निकाल जाहीर करणे ही न्यायाधिकरणांची व प्राधिकाऱ्यांची जबाबदारी आहे, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले.

**८. महाराष्ट्र झोपडपट्टी कायद्यांतर्गत अनधिकृत हस्तांतरण आणि पॉवर ऑफ अटर्नीवर बंदी**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा) कायद्याच्या कक्षेत झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांमधील घरांचे किंवा गाळ्यांचे अनधिकृत हस्तांतरण आणि पॉवर ऑफ अटर्नीच्या (POA) आधारे होणारे व्यवहार बेकायदेशीर ठरतात, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला.

**९. रेडी रेकनर दरापेक्षा कमी बाजारमूल्य ग्राह्य धरले जाणार नाही**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** मुद्रांक शुल्क आणि मिळकत मूल्यांकनाच्या प्रकरणात, शासनाने निर्धारित केलेल्या 'रेडी रेकनर' दरापेक्षा कमी बाजारमूल्य दाखवून मुद्रांक शुल्कात कपात मागता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने महसूल विभागाची भूमिका योग्य ठरवली.

**१०. अन्न आणि औषध प्रशासनाच्या (FDA) कारवाईवर हॉटेल परवाना निलंबन प्रकरणी व्यावहारिक दृष्टिकोन**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ
- **निर्णय:** किरकोळ व तांत्रिक कारणांवरून अन्न व औषध प्रशासनाने (FDA) हॉटेल्स किंवा रेस्टॉरंट्सचे परवाने थेट निलंबित करण्यापूर्वी प्रशासनाने वास्तववादी आणि व्यावहारिक भूमिका घेतली पाहिजे, कारण यामुळे उपजीविकेचे साधन धोक्यात येते, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले.

# सर्वोच्च न्यायालयाचे टॉप १० निकाल  (३ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट)

**१. बालकांवरील अपंगत्वाची आजीवन भरपाई**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारीया
- **निर्णय:** सर्वोच्च न्यायालयाने ओडिशामधील एका सहा महिन्यांच्या मुलीच्या अपघाती खटल्यात भरपाईची रक्कम दुप्पट करत ८३.३८ लाख रुपये केली. न्यायालयाने स्पष्ट केले की, अल्पवयीन बालकांच्या अपंगत्वाच्या प्रकरणात भरपाई ठरवताना संपूर्ण आयुष्यातील वेदना, वैद्यकीय खर्च आणि कार्यक्षमतेचे झालेलं नुकसान या सर्व बाबींचा आजीवन विचार केला पाहिजे.

**२. जन्मठेपेच्या संवैधानिक वैधतेवर शिक्कामोर्तब**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ
- **निर्णय:** दोषीच्या संपूर्ण नैसर्गिक आयुष्यासाठीची जन्मठेप ही भारतीय दंड संहितेनुसार पूर्णपणे कायदेशीर व संवैधानिक आहे, असे न्यायालयाने पुन्हा स्पष्ट केले. गंभीर गुन्हेगारांना सवलतीशिवाय आयुष्यभर तुरुंगात ठेवण्याचा न्यायालयांना अधिकार असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्या.

**३. पादचाऱ्यांसाठी रस्ते मोकळे व सुरक्षित ठेवण्याचे निर्देश**

- **तारीख:** ३ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे
- **निर्णय:** पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी, प्रत्येक रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि अनधिकृत बांधकामांपासून मुक्त पट्टा (Walkway) असणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने केंद्र व राज्य सरकारांना निर्देश दिले.



**४. जीएसटीच्या दुबार व समांतर नोटिसांवर स्थगिती**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ
- **निर्णय:** सीजीएसटी कायदा, २०१७ च्या कलम ७४ अंतर्गत बजावलेल्या नवीन जीएसटी शो-कॉज नोटीसमध्ये कायदेशीर त्रुटी आढळल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्यावर स्थगिती आणली. आधीच अपील प्राधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या करविषयक मुद्द्यांवर कर अधिकाऱ्यांनी समांतर कारवाई करू नये, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

**५. आयात केलेल्या मॉड्यूल्सच्या अनपॅकिंगवर उत्पादन शुल्क लागू नाही**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती एस.व्ही.एन. भट्टी आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया
- **निर्णय:** आयात केलेल्या तांत्रिक सामग्रीचे केवळ वर्गीकरण करणे किंवा स्थानिक स्तरावर त्याचे बॉक्स उघडून सुटे करणे म्हणजे केंद्रीय उत्पादन शुल्क कायद्यानुसार "उत्पादन" नव्हे, असे स्पष्ट करत महसूल विभागाची कोट्यवधी रुपयांची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली.

**६. सर्वोच्च न्यायालयाचे पूर्वकालीन निर्णय लागू असणे**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू
- **निर्णय:** जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा एखादा निर्णय स्पष्टपणे भविष्यात लागू होईल (Prospective) असे सांगत नाही, तोपर्यंत न्यायालयाचे सर्व कायदेशीर अर्थनिर्णय आणि कायदे हे मूळ काळापासून म्हणजेच पूर्वकालीन (Retrospective) प्रभावाने लागू असतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**७. शिवसेना (ठाकरे गट) विरुद्ध शिंदे गट प्रकरण**

- **तारीख:** ५ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना
- **निर्णय:** उद्धव बाळासाहेब ठाकरे (UBT) गटाच्या याचिकांवर अंतिम सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाने असे मौखिक निरीक्षण नोंदवले की, राजकीय पक्षाचे आपल्या विधिमंडळ पक्षावर पूर्ण आणि कायदेशीर नियंत्रण असते. विधिमंडळात बंडूगट कितीही संख्येने पुढे असला तरी, मूळ राजकीय पक्षाचा निर्णय हा अंतिम मानला गेला पाहिजे. विधानसभा अध्यक्षांचा अपात्रतेवरील निर्णय आणि निवडणूक आयोगाचा शिंदे गटाला मान्यता देण्याचा निर्णय यावर न्यायालयात कायदेशीर बाबी तपासल्या जात आहेत.

**८. नीट-युजी परीक्षा संगणकीय प्रणालीवर नेण्याबाबत विचार**

- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे
- **निर्णय:** नीट-युजी परीक्षेच्या सुधारणा प्रकरणावर सुनावणी करताना, पारंपरिक पेन-पेपर पद्धतीऐवजी परीक्षा संगणकीय (Online) पद्धतीने घेण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याची माहिती न्यायालयाने नोंदवून घेतली आणि याचिकाकर्त्यांना प्रतिज्ञापत्रावर उत्तर दाखल करण्यास सांगितले.

**९. प्रलंबित औद्योगिक विवादांवर अंतिम तोडगा आणि निर्देश**


- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ
- **निर्णय:** अनेक दशके रेंगाळलेल्या कामगार व औद्योगिक विवादांवर तातडीने पडदा पाडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या विशेष अधिकारांचा वापर करत निर्देश दिले. प्रदीर्घ खटल्यांमुळे कामगार कल्याणाच्या उद्देशाला हरताळ फासला जातो, असे सांगत न्यायालयाने तात्काळ आर्थिक तडजोड करण्याचे आदेश दिले.

**१०.व्यावसायिक लवादांच्या अधिकारांवर न्यायालयीन हस्तक्षेपाबाबत**

- **तारीख:** ६ ऑगस्ट २०२६
- **पीठ (Bench):** सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ
- निर्णय: व्यावसायिक लवाद न्यायाधिकरणांच्या (Arbitral Tribunals) प्राथमिक कामकाजात उच्च न्यायालयांनी विनाकारण आणि घाईघाईने हस्तक्षेप करू नये, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. यामुळे लवाद कायद्याचा मूळ उद्देश असलेल्या जलद गतीने न्याय देण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो, असे न्यायालयाने अधोरेखित केले.

## द इंडियन पिनल कोड १८६०: इम्पॉर्टंट अँड लेटेस्ट केस लॉज - डॉ. मनमोहन जोशी यांचे मार्गदर्शक पुस्तक

भारतीय दंड संहिता, १८६० (IPC) या मूलभूत फौजदारी कायद्याच्या अभ्यासात न्यायालयीन निवाड्यांचे (CASE LAWS) महत्त्व अत्यंत अनन्यसाधारण आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन डॉ. मनमोहन जोशी (एम. जे. सर) यांचे "द इंडियन पिनल कोड १८६० – इम्पॉर्टंट अँड लेटेस्ट केस लॉज" हे अत्यंत उपयुक्त पुस्तक कायदेशीर जगतात आणि विद्यार्थी वर्गात आले आहे.





**कायदेशीर अभ्यासात खटल्यांचे महत्त्व आणि पुस्तकाची गरज:**
कोणताही कायदा समजून घेण्यासाठी आणि त्याचे योग्य अर्थ लावण्यासाठी खटल्यांची भूमिका महत्त्वाची असते. भारतीय दंड संहिता (IPC) हा विविध फौजदारी गुन्ह्यांची व्याख्या करणारा आणि त्यांना शिक्षा सुनावणारा एक सर्वसमावेशक कायदा आहे. परंतु, कायद्यातील भाषा किंवा कलमांमधील शब्दरचना नेहमीच प्रत्येक बाब उलगडून सांगेलच असे नाही. अशा वेळी न्यायालयांचे निर्णय, म्हणजेच न्यायालयीन दाखले , वास्तविक जीवनातील प्रसंगांवर कायद्याच्या तरतुदी लागू करून मार्ग दाखवतात. न्यायालयांचे हे निर्णय समजण्यास सोपे आणि स्पष्टीकरण देण्यात मदत करतात आणि कायद्याची एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यास मदत करतात.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये:**
टिकाऊ आणि आधुनिक संकलन: या पुस्तकात भारतीय दंड संहितेशी संबंधित सर्व अत्याधुनिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे निर्णय एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
न्यायव्यवस्था परीक्षांसाठी उपयुक्त: केवळ कायदेशीर कलमे वाचण्याऐवजी प्रत्यक्ष खटल्यांमधील न्यायालयाचे तर्कशास्त्र समजून घेतल्यास न्यायव्यवस्था परीक्षा व एलएलबीच्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश मिळवणे सोपे होते.
**कायदेशीर शब्दांची स्पष्टता:** गुन्ह्यांच्या विविध तांत्रिक संकल्पना आणि कायदेशीर अटींचा नेमका अर्थ काय होतो, हे समजून घेण्यासाठी हे पुस्तक विद्यार्थ्यांना आणि वकिलांना उत्तम मार्गदर्शन करते.
फौजदारी कायद्याची सखोल जाण मिळवण्यासाठी आणि कायदेशीर परीक्षांमध्ये यश संपादन करण्यासाठी प्रत्येक कायद्याच्या विद्यार्थ्याने आणि प्रॅक्टिस करणाऱ्या वकिलाने हे पुस्तक आपल्या संग्रही ठेवणे गरजेचे आहे.

## द आर्ट ऑफ क्रॉस-एक्झामिनेशन: न्यायशास्त्रातील एक अजरामर कलाकृती

कायदेशीर इतिहासामध्ये फारच थोड्या पुस्तकांना क्लासिक ग्रंथाचा दर्जा मिळाला आहे. १९ व्या शतकातील प्रसिद्ध ट्रायल वकील फ्रान्सिस एल. वेल्मन यांचे "द आर्ट ऑफ क्रॉस-एक्झामिनेशन" हे पुस्तक याच निवडक आणि अजरामरकृतींमध्ये अग्रस्थानी आहे. सन १९०३ मध्ये पहिल्यांदा प्रकाशित झालेला हा मूलभूत ग्रंथ, वेल्मन यांचे उलटतपासणीवरील तज्ज्ञांचे विचार तसेच त्यांच्या स्वतःच्या कारकिर्दीतील, इतर नामवंत वकिलांच्या अनुभवांमधील आणि त्या काळातील गाजलेल्या खटल्यांच्या सजीव उदाहरणांचे सुरेख संकलन आहे.





पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि महत्त्व:
फक्त वकिलांसाठीचे एक व्यावहारिक हँडबुक एवढ्यापुरते या पुस्तकाचे महत्त्व मर्यादित नसून, कोर्टरूममध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणा, बारकावे आणि मानसिक कौशल्यांचा हा एक कालातीत शोध आहे.
तर्क आणि संभाषणाची कला: वेल्मन यांचे अभ्यासपूर्ण आणि आकर्षक लेखन प्रभावी प्रश्नांची रचना, तर्कशास्त्र, मन वळवण्याची हातोटी आणि अंतःप्रेरणा यांचा DELICATE INTERPLAY अचूकपणे उजेडात आणते.
वास्तविक जीवनातील उदाहरणे: विपुल प्रमाणात दिलेली खरी उदाहरणे आणि केस स्टडीज वाचकांना कायदेशीर वकिलीच्या नाट्यमयतेचा आणि गुंतागुंतीचा जवळून अनुभव देतात.
शब्द आणि युक्तिवादाची ताकद: तुम्ही कायदेशीर व्यावसायिक असाल, वक्तृत्वाचे अभ्यासक असाल किंवा केवळ पटवून देण्याच्या कलेमध्ये स्वारस्य ठेवणारे असाल, हा ग्रंथ शब्दांची ताकद आणि युक्तिवादाचे कौशल्य शतकानुशतके कसे टिकून आहे, याची प्रचिती देतो.
कायद्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, तरुण वकील आणि न्यायालयात प्रभावी युक्तिवाद करण्याचे कौशल्य आत्मसात करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक अत्यंत मार्गदर्शक आणि संग्रही ठेवण्यासारखे आहे.

## क्रिमिनल माईंडसेट: थिंक लाईक अ क्रिमिनल अँड अॅक्ट लाईक अ लॉयर - रणनीती आणि सत्तेचा नवा दृष्टिकोन

सत्तेची पहिली पायरी म्हणजे नियम हे मोडण्यासाठीच असतात हे समजून घेणे," या अत्यंत प्रखर भूमिकेतून वैभव यादव यांचे "क्रिमिनल माईंडसेट: थिंक लाईक अ क्रिमिनल अँड अॅक्ट लाईक अ लॉयर" हे पुस्तक कायदेशीर आणि रणनीतिक जगतात चर्चेत आले आहे.

**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि मुख्य गाभा:**
नशीब नेहमी बहाद्दरांच्या पाठीशी असते असे म्हटले जाते, परंतु जर तुम्ही एका मास्टर रणनीतिकारासारखा विचार करू शकलात, एका मुरलेल्या चोराच्या धोरणीपणाने आणि उच्च दर्जाच्या वकिलाच्या अचूकतेने पावले उचलली, तर काय होईल? हा प्रश्न हे पुस्तक वाचकांसमोर उभा करते.


**सत्तेचे आभियांत्रिकीकरण:**
हे पुस्तक अशा एका जगाची ओळख करून देते जिथे सत्ता सहज मिळत नाही, तर तिची जुळवाजुळव करावी लागते. समाजाच्या कायदेशीर राखाडी क्षेत्रांतून (GREY ZONES) मार्ग काढणाऱ्या चलाख मनांच्या युक्तींवर यात प्रकाश टाकला रूढ करण्यात आला आहे.




**नियम न मोडता कडा गाठणे:** हे पुस्तक कायदा मोडण्याचे समर्थन करत नाही, तर कायदेशीर चौकटीत राहूनच लोकांच्या धारणा बदलणे, गोंधलाच्या परिस्थितीतून स्वतःसाठी संधी निर्माण करणे आणि तातडीने निर्णय घेण्याचे कौशल्य शिकवते.
**धोका आणि संधी यांचे पुनर्रचन:** हे पुस्तक बेदरकार लोकांसाठी कोणतेही मॅन्युअल नाही. तर ज्यांना अधिक तीक्ष्णपणे विचार करायचा आहे, शस्त्रक्रियेच्या अचूकतेने कृती करायची आहे आणि प्रस्थापित नियमांच्या अगदी कधारावर राहूनही कायदेशीर मर्यादेत राहायचे आहे, त्यांच्यासाठी हा एक विचार करायला लावणारा प्रवास आहे.
उद्योजक असोत, नवीन करिअर घडवणारे व्यावसायिक असोत किंवा आयुष्यात जिंकायची तीव्र जिद्द असणारे कोणीही असोत, हे पुस्तक जोखीम, सत्ता आणि संधीकडे बघण्याचा तुमचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकते.

## डिक्शनरी ऑफ लीगल टर्म्स: कायद्याच्या शब्दांचा सर्वसमावेशक संदर्भग्रंथ

कायद्याच्या अभ्यासात आणि न्यायालयीन क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या विविध तांत्रिक शब्दांचा नेमका अर्थ समजून घेण्यासाठी आरपीएच एडिटोरियल बोर्ड यांचे "डिक्शनरी ऑफ लीगल टर्म्स" हे अतिशय उपयुक्त पुस्तक प्रकाशित झाले आहे. कायद्याच्या विविध शाखांमधील वारंवार वापरल्या जाणाऱ्या शब्दांची आणि व्याख्येची ही एक अत्यंत सुटसुटीत संदर्भ पुस्तिका आहे.
**पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये आणि रचना :** सुलभ आणि संक्षिप्त माहिती: कायद्याच्या क्षेत्रातील अगदी लहानात लहान तपशील समजून घेऊ इच्छिणाऱ्या जिज्ञासू वाचकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त माहिती पुरवते. कायद्याचे सर्व महत्त्वाचे पैलू यात सोप्या भाषेत मांडण्यात आले आहेत.
**वर्णमालेनुसार मांडणी:** पुस्तकातील सर्व शब्दांची मांडणी वर्णमालेनुसार करण्यात आली आहे, ज्यामुळे वाचकांना हवा असलेला शब्द आणि त्याची व्याख्या अतिशय कमी वेळेत शोधणे सोपे जाते.
**स्पष्ट व सुलभ भाषा:** सर्व शब्दांचे अर्थ आणि व्याख्या अत्यंत सोप्या आणि वाचकांसाठी सुगम भाषेत स्पष्ट करण्यात आल्या आहेत.
**परस्पर संदर्भ:** पुस्तकातील परस्पर संदर्भांमुळे वाचकांच्या मनातील कायदेशीर शब्दांबद्दलचे सर्व संभ्रम दूर होतात आणि विविध कायदेशीर अटींची समज अधिक दृढ होण्यास मदत मिळते.




**कोणासाठी उपयुक्त?**
कायद्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध स्पर्धा परीक्षा किंवा प्रवेश परीक्षा देणारे उच्च शिक्षणार्थी, तसेच कायद्याच्या क्षेत्रातील सर्वसामान्य आणि जिज्ञासू वाचकांसाठी हे पुस्तक एक त्वरित संदर्भ म्हणून अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

# राज्यातील बार कौन्सिलमध्ये महिलांना नामांकन!

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश; उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना मिळणार नामांकनाचे अधिकार

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com



राज्य बार कौन्सिलमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी आणि कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. या आदेशानुसार, संबंधित क्षेत्रातील उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना राज्याच्या बार कौन्सिलवर सह-संयोजित (co-opt) महिला सदस्यांची नावे सुचवण्याचा आणि नामांकित करण्याचा अधिकार देण्याबाबत विचार केला जाऊ शकतो. यामध्ये उच्च न्यायालयाच्या माजी महिला न्यायमूर्ती किंवा बारमधील ज्येष्ठ महिला कायदेतज्ज्ञ यांचा समावेश असेल.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, या प्रक्रियेमुळे वैधानिक संस्थांच्या कारभारात वस्तुनिष्ठता, स्वायत्तता आणि पारदर्शकता येईल. न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, "न्यायालयाच्या सूचनेनुसार एक विस्तृत सहमती दर्शवली गेली आहे की, संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना राज्य बार कौन्सिलवर सह-संयोजित महिला सदस्यांचे नामांकन करण्याचे अधिकार दिले जावेत."

या नामांकनासाठी पात्र ठरणाऱ्या महिला सदस्यांच्या निकषांमध्ये संबंधित उच्च न्यायालयाची माजी महिला न्यायमूर्ती; किंवा संबंधित राज्याची/राज्यांची ज्येष्ठ महिला वकील किंवा योग्य प्रतिष्ठा असलेली बारची महिला सदस्य.यांचा समावेश असेल:

**दोन प्रमुख मुद्द्यांवर सुनावणी**

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचार केला; राज्य बार कौन्सिलमध्ये महिला सदस्यांच्या सह-संयोजनासाठी निकष काय असावा आणि दुसरा मुद्दा एकल हस्तांतरणीय मतांचे हस्तांतरण करण्याची योग्य पद्धत कोणती असावी आणि विशेषतः महिला उमेदवारांच्या बाबतीत ही मते कशी गणली जावीत. पहिल्या मुद्द्याबाबत न्यायालयाने सांगितले की, यावर न्यायालयात उपस्थित विविध राज्यांच्या बार कौन्सिलचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**महिलांसाठी ३० टक्के आरक्षणाचे धोरण**

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला होता की, ज्या राज्यांमध्ये बार कौन्सिलच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तेथे ३० टक्के जागा महिला वकिलांसाठी राखीव ठेवल्या जाव्यात. चालू निवडणूक वर्षासाठी न्यायालयाने ही आरक्षण प्रणाली खालीलप्रमाणे अमलात आणण्याचे निर्देश दिले आहेतः त्यानुसार २० टक्के जागा महिला सदस्यांच्या थेट निवडणुकीद्वारे भरल्या जाव्यात.आणि १० टक्के जागा सह-संयोजनाच्या माध्यमातून भरल्या जाव्यात.

काही राज्यांमध्ये संयुक्त बार कौन्सिलची रचना असते (उदा. महाराष्ट्र आणि गोवा किंवा तामिळनाडू आणि पुद्दुचेरी), तेथील प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि इतर सर्व महत्त्वाच्या घटकांचा विचार करून न्यायालयाने वकिलांना आपल्या सूचना किंवा मते सादर मुभा दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती न्या. सुधांशू धुलिया यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय पर्यवेक्षी समितीकडे एका आठवड्याच्या आत या सूचना पाठवणे आवश्यक असणार आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये, बार कौन्सिल ऑफ इंडियाआणि राज्य बार कौन्सिलमध्ये महिला, अल्पसंख्याक, दिव्यांग आणि उपेक्षित घटकांचे अपुरे प्रतिनिधित्व असल्याबद्दल चिंता व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका (PIL) दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च बार असोसिएशनच्या सदस्या आणि याचिकाकर्त्या योगमाया एम.जी. यांनी या संस्थांमधील प्रमाणात प्रतिनिधित्व नसण्याच्या मुद्द्यावर लक्ष वेधत न्यायालयाकडे दाद मागितली होती. या संपूर्ण प्रकरणाची सुनावणी 'एम. वरधन विरुद्ध भारत सरकार' या खटल्यांतर्गत पार पडली.

# निवडणुका लढण्यासाठी दोनच अपत्ये नियमाचा फेरविचार?

## प्रजनन दरातील घट आणि विसंगत कायदेशीर धोरणांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला निकाल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com



ग्रामपंचायत किंवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना अपात्र ठरवण्याच्या नियमावर फेरविचार करण्याची गरज आहे का, या अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सविस्तर सुनावणी पूर्ण केल्यानंतर हा निर्णय सुरक्षित ठेवला आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी व कायदेशीर लढाई :** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १४(१)(ज-१) नुसार, १३ सप्टेंबर २००० नंतर ज्या व्यक्तीला तिसरे अपत्य जन्माला आले आहे, ती व्यक्ती ग्रामपंचायतीची निवडणूक लढवण्यास किंवा सदस्य पद भूषवण्यास अपात्र ठरते. याच कायद्यांतर्गत अमरावती विभागातील काकोडा ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सरपंच मंगला भीमराव इंगळे यांना तिसऱ्या अपत्याच्या जन्मानंतर अपात्र ठरवण्यात आले होते. अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त आयुक्तांनी त्यांच्या विरोधात दिलेले निर्णय कायम ठेवल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने ५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांची याचिका फेटाळून लावत प्रशासनाची कारवाई वैध ठरवली होती. या निर्णयाविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली होती, ज्यावर मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली होती.

**'जावेद विरुद्ध हरियाणा' निकालावर पुनर्विचाराचे संकेत :** सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने २००३ च्या 'जावेद विरुद्ध हरियाणा राज्य' या ऐतिहासिक निकालावर पुनर्विचार करण्याची गरज आहे का, किंवा हा विषय मोठ्या खंडपीठाकडे पाठवावा का, यावर विचार करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. २००३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हरियाणा पंचायती राज कायदा, १९९४ ची वैधता कायम ठेवली होती. या कायद्यान्वये दोनपेक्षा जास्त जिवंत अपत्ये असलेल्या व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यापासून अपात्र ठरवण्यात आले होते. याशिवाय, २०२४ मधील 'रामजी लाल जाट विरुद्ध राजस्थान राज्य' या प्रकरणातही याच निकालाचा दाखला देण्यात आला होता.

**विविध राज्यांतील कायद्यांची भिन्न परिस्थिती :** सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या सूचनेवरून अमायकस क्युरी ॲड. रुक्मिणी बोबडे आणि याचिकाकर्त्याचे वकील प्रतिक बोमबर्डे यांनी देशातील विविध राज्यांतील कायद्यांची माहिती देणारे संकलन न्यायालयासमोर सादर केले. या अहवालानुसार देशात कोणतीही एकसमान भूमिका पाहायला मिळत नाहीः

देशातील तब्बल ७ राज्यांनी 'दोन अपत्यांचे धोरण'आता रद्द केले आहे. १५ राज्यांमध्ये असे कोणतेही निर्बंध किंवा धोरण अस्तित्वात नाही.

सध्या आसाम, गोवा, गुजरात, महाराष्ट्र, ओरिसा आणि उत्तराखंड या राज्यांमध्येच हे धोरण अद्याप लागू आहे. भारतातील खालावत चाललेला प्रजनन दर, राज्या-राज्यांमधील विसंगत कायदे आणि लोकप्रतिनिधींच्या मूलभूत अधिकारांचा प्रश्न या सर्व बाबींवर सर्वोच्च न्यायालय आता काय अंतिम निर्णय देते, याकडे देशभरातील कायदेतज्ज्ञांचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration(PRGI) No. MHBIL/25/A1380: "Pune Bar And Bench", weekly newspaper owned & published by Vijay Prabhakar Chavan, and printed by Prasad Shantaram Pathak at the Sakal Media Pvt Ltd, Sr No. 159/160, behind Laxman Weigh Bridge, Saswad Road, Pune- 411028, Published at Pune Bar And Bench, Office No. 7, 1st floor, Chunawala Chambers, 103, Shivajinagar, Near Shikshan Mandal, Juna Topkhana, Pune-411005. Resident Editor : Vijay Prabhakar Chavan (Responsible for selection of news under PRB Act.)
Managing Editor: Mr. Mysore Jagadishbabu Srikant. All rights reserved. Reproduction in whole or in part without written permission of the publisher is prohibited. (contact : 99229 62535)